मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ९१ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ सप्टेंबर २०१२

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.

'अधिकस्य अधिकं फलं' अशा अधिक महिन्यात हितगुजचा सप्टेंबर २०१२ चा अंक प्रकाशित होत आहे. पावसाळा असा रूसला आहे की तो अजून बरसलाच नाही. पावसाळ्याची दोन्ही नक्षत्रे कोरडीच गेली. धरणीमाता पावसासाठी आतुर झाली आहे. सर्व सृष्टी पावसाअभावी म्लान दिसते आहे. शहरवासियांच्या मानगुटीवर पाणी-टंचाईची भीती बसली आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला तर सीमाच नाही. चिखलात, पाण्यात पाय बुडवून त्यांना दोबरा पेरण्या-आवण्या कराव्या लागत आहेत. दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांच्या दु:स्थितीवर पडले आहे. राजकारणी मंडळी धान्यटंचाई होणार नाही अशी आश्वासने देण्याचे काम तेवढे करताहेत.

दिनांक १५ ऑगस्ट २०१२ ला भारताचा ६६वा स्वातंत्र्यदिन आपण साजरा केला. संसदेला ६० वर्षे झाली. तरीही आपण स्वातंत्र्यानंतर ६० वर्षेही सरळ राज्य करू शकलो नाही. कारण मताला लाचार झालेले राजकारणी निवडणुकीला पैशाच्या जोरावर निवडून येणारे लोकप्रतिनिधी, काळा पैसा साठविणारे साठेबाज बेशिस्त लोक, ज्यांनी लोकांचे प्रश्न सोडवायचे ते प्रतिनिधीच सभागृहात गोंधळ घालतात. नक्षलवाद, भ्रष्टाचार, महागाई माजला आहे. आसाम पेटले आहे. आझाद मैदानात जाळपोळ, पोलिसांवर गोळीबार झाला तरी सरकार गप्प बसले आणि रमझान ईद झाल्यावर कारवाई करण्याचा मूर्खपणा खपवून घेतला जातो आहे. दहशतवादी संघटना बॉम्बस्फोट घडवून आणत आहेत. देश विनाशापासून वाचवायचा असेल तर प्रत्येकाने विचार, जागृती करून योग्य ती कृती करण्याची वेळ आली आहे. असो.

पावसाने सध्या पाठ फिरविली असली तरी आपल्या हितगुजने पाठ फिरविली नाही मित्रांनो. शनिवार दिनांक १५ सप्टेंबरला ठाणे येथील लक्ष्मी केशव हॉल येथे वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. त्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे ही आग्रहाची विनंती आहे. याच सभेत गुणवत्ता पारितोषिके वितरणाचा कार्यक्रम आहे. मराठे परिवारातील हुशार, गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आपण सर्वांनी यायला हवे आहे.

या अंकात वार्षिक अहवाल, आय-व्यय, हिशेबपत्रक, ताळेबंद दिला आहे. हितगुजला आर्थिक साहाय्य भरभरून करावे. ज्यांनी वर्गणी दिली नाही त्यांनी ती त्वरित पाठवून द्यावी. मराठे प्रतिष्ठानचे जे सभासद नसतील त्यांना प्रतिष्ठानचे सभासद बनण्याचे आवाहन करावे. जाहिरातीच्या स्वरूपात, वाढदिवस वा लग्नकार्य, स्मृतीदिन, पुण्यतिथीच्या

### ✻ जाहीर निमंत्रण ✻

**मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा**

शनिवार दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ सकाळी १० वाजता. लक्ष्मी केशव हॉल, प्रताप सिनेमासमोर, खोपट, ठाणे (प.) येथे आयोजित केली आहे.

सर्वांनी उपस्थित राहावे, हे आग्रहाचे निमंत्रण

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३११११९०२ ◆

Marathe Pratishthan

निमित्ताने हितगुजला देणग्या द्याव्यात ही विनंती. वाईट वाटावी अशी गोष्ट म्हणजे मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीवरील सदस्य, कुलवृत्तांताला मदत करणारे श्री. मा. ना. मराठे यांचे दु:खद निधन झाले त्यांनाही विनम्र आदरांजली!

या अंकात, श्री. रमाकांत विद्वांस यांचा कर्तृत्वशाली आलेख, विंग कमांडर श्री. यशवंत मराठे यांची अद्‌भुत आणि आनंददायी सायकलसफर, संपूर्ण भारत सायकल भ्रमण अभियानाचे स्वप्न त्यांचे पूर्ण झाले, पोहणारे वीर श्री. दत्तात्रेय मराठे, काही सांस्कृतिक धारणा हा लेख, अधिम मासाविषयी: थोडेसे अधिक या लेखात सौ. गायत्री जोशी (खांबेटे) यांनी उद्‌बोधक माहिती दिली आहे. कविता, नेवैद्य काव्यसंग्रहाची ओळख, मानसन्मान, सहवेदना, वाचकांचा पत्रव्यवहार इ. वाचनीय मजकूर आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेला आपली भेट होईल. त्या सभेत आपण आपल्या सूचना, मते मांडू शकता.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे** (पृ.१२०)
८/१३ सहकार नगर, वडाळा, मुंबई, ४०००३१
फोन ०२२-२४१५०८८९
१८ ऑगस्ट, २०१२

## गुलाबाचे फूल

*एका झाडावर होते एक गुलाबाचे फूल*
*पाहत होते ऐटीने इकडेतिकडे*
*एक रमणी आली. हळूच खुडून माळले केसामध्ये*
*रस्त्याने ऐटीत चालू लागली.*
*फुलाला झाला गर्व*
*पहा पहा आमची जागा बायकांच्या डोक्यावर*
*तुच्छतेने इतरांकडे पाहू लागले*
*संध्याकाळ झाली फूल कोमेजसे*
*रमणीने खसकन ओढून फेकून दिले रस्त्यात*
*हाय रे गुलाबाच्या फुला*
*भोग आपल्या कर्माची व्यथा*

**तात्पर्य : गर्वाचा फुगा फुटणारच**

**मधुसूदन प्रभाकर विद्वांस**
हृषिकेश सोसायटी. बी विंग, तळमजला ब्लॉक नं.३, कचेरी रोड, कर्जत (रायगड)

**'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात**

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन
या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.
पाव पान रु. ६००/- * अर्धे पान रु. १,२००/- * पूर्ण पान रु. २,५००/-
रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.



Marathe Pratishthan

सर्व धर्म एकच असून ते माणसाला ईश्वरापर्यंत घेऊन जातात.

# बंदी : तिंबूनाना जहागिरदार

**अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२)**

कारागृहात काम करताना निरनिराळ्या प्रकारच्या असंख्य बंदीजनांशी माझा संबंध आला. ठाणे कारागृहात काम करीत असता असाच एक बंदी तिंबूनाना जहागीरदाराशी संबंध आला. एम.ए. झालेला हा बंदी परमेश्वराकडून उपजतच काही देणग्या घेऊन आला होता. ''नाही, मी नाही शक्य नाही हे शब्दच त्याचे शब्द कोशात नव्हते. नाट्य, संगीत, विज्ञान, चित्रकला सर्व ठिकाणी त्याची मती, गती निर्वेधपणे चालत असे. कारागृहातील पिठाची चक्की एकदा अचानक बिघडली. तेथील तुरुंगाधिकारी अधिक्षकांशी चक्की दुरुस्तीसाठी बाहेर पाठवण्याबाबत चर्चा करीत होते. योगायोगाने मी तिथे उपस्थित होतो. धान्य निवडण्याचे काम तिंबूनानांकडे होते. तिंबूनानाने सर्व संभाषण ऐकले व तो म्हणाला, ''साहेब मी जरा चक्कीची पाहणी करतो आणि नेमके काय झाले आहे ते पाहतो.'' साहेबांनी त्याला परवानगी दिली. तिंबूनानाने लगेच निळा ॲप्रन चढवला. सुतार व लोहार कामातून पाहिजे ती हत्यारे मागून घेतली. सुमारे दोन तास तो चक्कीशी झगडत होता. दोन तासांनी पूर्ववत चक्कीचा पट्टा फिरू लागला. चक्कीवाल्याने ताबडतोब धान्य दळायला टाकले. आणि भराभर पीठ येऊ लागले. तुरुंगाधिकारी यांनी अधिक्षकांना बोलावून घेतले व दोघांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. या सर्व प्रकरणात दोघांनी तिंबूनानांचे विशेष कौतुक केले. व त्याला सात दिवसांची विशेष माफी शिक्षेमध्ये दिली.

महात्मा गांधींचा जन्मदिन २ ऑक्टोबर हा कारागृहात 'बंदी कल्याण दिन' म्हणून पाळला जातो. त्या दिवशी बंदींचे नातेवाईक त्यांच्या त्यांच्या बंदीना भेटायला येतात. त्या दिवशी नाट्यछटा, गायन किंवा अन्य करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यावर्षीच्या २ ऑक्टोबरला बंद्यांनी 'सुवासे धन्य मी चंदनाच्या' हे छोटेखानी दीड तासाचे नाटक बसवले होते. हे नाटक कसले, दीड तासाची नाटुकली होती ती. नाटकाचं तंत्र, दिग्दर्शन सर्व काही तिंबूनानांचं होतं. सर्व बंदींनी उत्तम अभिनय केला होता. कारागृहाचे काही वरिष्ठ अधिकारी नाटक पाहण्यास आले होते. त्यांनी बंदींचे विशेष कौतुक केले. तिंबूनानांनी लगेच रंगमंचावर जाऊन सर्व बंदींनी विशेष माफी द्यावी म्हणून विनंती केली. अर्थातच ती ताबडतोब मंजूर झाली. सर्व बंदींनी आपापले काम सांभाळून तालीम केली होती. बराकीमध्ये रात्री जागून बंद्यांनी तालमी केल्या होत्या. तिंबूनानांनी त्याचवर्षी जाहीर केले 'पुढील वर्षी नाटक क्रांतिवीर तात्याटोपे यांचे जीवनावर करणार, आणि तात्याटोप्यांची भूमिका ते स्वत:च करतील.'' निम्मीअधिक पात्रयोजना त्यांनी बंद्यांची नावं जाहीर करून टाकली. आणि दिग्दर्शक म्हणून माझेही नाव जाहीर केले. माझे काम म्हणून मी मा.अधिक्षक यांच्यासमवेत राऊंड म्हणजे नित्याच्या फेरीस जात असे. व फेरीमधील सर्व बंदींचे विनंती अर्जाचा तपशील पुढील कार्यवाहीसाठी नोंदवत असे. व त्यानुसार मा. अधिक्षक त्यांना आठवण देत असे. त्या दिवशी फाशीचे बंदी असलेल्या कोठड्यामधून साप्ताहिक फेरी होती. एक फाशीचा बंदी बाहेरून शालांत परीक्षेला बसणार होता. त्याने अधिक्षकांना विनंती अर्ज केला होता. त्याच्या शालांत परीक्षेचा अभ्यास चालू आहे. त्याला गणित, भूमिती या विषयांमध्ये बाहेरून मार्गदर्शन हवे होते. कारागृहाचे नेमलेले शिक्षक हे काम स्वत: करण्यास असमर्थ होते. तिंबूनानांच्या हे कानावर गेले तेव्हा त्यांनी स्वत: गणित, भूमिती हे विषय फाशीच्या त्या बंदीस शिकवण्याची तयारी दर्शवली. मा. अधिक्षकांनी ती मान्य केली. त्यासाठी विशेष बंदोबस्त ठेवण्याचे व विशिष्ट वेळ ठरवण्याचे आदेश दिले. दुसऱ्यादिवशी पासून फाशीचा बंदीही मनापासून तिंबूनानाकडून शिकत होता. पोलिसांच्या विशेष बंदोबस्तात बंदीने परीक्षा केंद्रावर उत्तमप्रकारे परीक्षा दिली व गणित, भूमिती या विषयात त्याने ८०%हून अधिक गुण मिळवले. पुढील साप्ताहिक फेरीचेवेळी फाशीचे बंदीने मा. अधिक्षक यांनी तिंबूनानांना सात दिवस विशेष माफी द्यावी अशी विनंती केली. अर्थात ती मान्य केली गेली. साक्षरता प्रचार मोहिमेचा प्रमुख बंदी शिक्षक म्हणून साक्षरता प्रचाराचे कारागृहातील वर्ग तिंबूनानाने धूमधडाक्यात सुरू केले.

एव्हाना तिंबूनानाने शिक्षेची तीन वर्षे पूर्ण केली होती. मिळालेली माफी धरून तो आणखी एक वर्षात सुटणार होता. नव्या योजनेअंतर्गत 'कारागृहाचे मागील बाजूस असलेल्या खुले कारागृहा'मध्ये पाठवण्याची मा. अधिक्षक यांना त्याने विनंती केली. चांगल्या वागणुकीमुळे त्याची ही विनंत मान्य झाली. खुल्या कारागृहात शेतीबरोबर जनावरांची देखरेख, दुधाचा व बीबियाणांचा हिशेब हे काम तो मनापासून करू लागला. त्याने कुक्कुट-पालनविषयक पुस्तकांचे भरपूर वाचन केले. आणि स्वतंत्र कुक्कुटपालनाचा प्रस्ताव मा.अधिक्षकांसमोर मांडला. अधिक्षकांनी एका सुमुहूर्तावर खुले कारागृहात कुक्कुटपालन सुरू केले. रोजच्या रोज कारागृहात अंडी विक्री सुरू झाली. कारागृहाच्या उत्पन्नाचे एक साधन नव्याने सुरू केल्याबद्दल तिंबूनानाचे विशेष कौतुक होऊन कारागृहाच्या खातेप्रमुखांनी त्याला घसघशीत माफी दिली.

तिंबूनानांची चित्रकलेतही चांगलीच गती होती. त्यांनी विशेष विनंती अर्ज करून बाहेरून वॉटर कलरचे रंग, ब्रश, ड्राईंग पेपर मुद्दाम मागून घेतले. समोर बसलेल्या व्यक्तीचे चित्र थोड्याच वेळात तो हुबेहूब काढत असे. मी न सांगताच त्याने माझेसुद्धा एक गणवेशामधील चित्र काढून मला भेट दिले होते. अक्कलकोट स्वामींवरील माझी श्रद्धा पाहून त्यांचेही एक रेखाचित्र त्याने मला भेट दिले. त्याची काही निसर्गचित्रे विक्री केंद्रातून विकली गेली व त्यातून मिळालेली रक्कम त्याच्या नावावर जमा केली गेली.

या सर्व बाबींचा विचार प्रमुखांनी आस्थेवाईकपणे केला. व नंतर १५ ऑगस्ट यादिवशी तिंबूनानांची कारागृहातून मुक्तता झाली. तिंबूनाना मुक्त होऊन घरी गेला पण इतर सर्व बंदींना त्याची विशेष आठवण ठेवून गेला. बंदींनाच काय सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्याची आठवण नेहमीच येत राहील.

**- अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२)**
कारागृह अधिक्षक, पुणे (निवृत्त) २६, शुक्रवार पेठ,
भाऊमहाराज रस्ता, पुणे ४११००२



Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 2

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

**'MY YEARS AT THE UNIVERSITY OF ROORKEE'**

Roorkee was famous for its University, Cantonment Area comprising mainly of Bengal Engineers Group of the Corps of Engineers of Indian Army and the Central Building Research Institute. Apart from these establishments, Roorkee was a sleepy little town in Uttar Pradesh [now Uttarakhand]. Roorkee is located north-east of Delhi at a distance of about 180 kms. on the Delhi – Haridwar Route. Haridwar is only about 32 kms. from Roorkee. The town is on the bank of Ganga Canal, which has a flow more than most rivers in Maharashtra. Motto of the University was "Shramam vina na kimapi sadhyam".

University of Roorkee [now IIT Roorkee ] has its origins in a class started in 1845 to train local youth in engineering to assist in public works It was named as the Thomason College of Civil Engineering in 1854 in honour of its founder, Sir James Thomason, Lieutenant Governor.

Initially, the college had engineering class only for Europeans, upper subordinate class for Europeans and Indians and lower subordinate class for Indians only. Such was the reputation of the college, that the recruitment of the Engineering students was directly controlled by the Public Works Departments (PWD). Every student was guaranteed a post in the PWD / irrigation departments..

Between 1934 to 1943, officers of the **Indian Army Corps of Engineers** received training at the Thomason College of Engineering and, even after the establishment of the School of Military Engineering (SME) at Roorkee in 1943, they continued to receive technical training at Thomason. In 1948, SME was moved to Dapodi, **Pune**. In November 1949, it was given the status of University and was titled University of Roorkee.

On 21 September 2001, the **Government of India** declared it as the nation's seventh Indian Institute of Technology, renaming it to the current name, Indian Institute of Technology Roorkee.

The eighteen month long period of post graduation at the University of Roorkee was a highly memorable period. It changed my outlook and life style.

One Mr. S. B. Joshi who was a very eminent Bridge Designer and Constructor was a very close friend of my father. In fact he was my mentor. He knew many famous Roorkee Alumnae and was convinced that Courses at Roorkee change the outlook of engineers and teaches them how to approach problems rationally. Mr. Joshi advised me to do some post-graduation at Roorkee. After my graduation in 1959, I had decided to seek a job and not continue to be a burden on my parents. Mr. Joshi gave me a loan to meet all my expenses for the full course and also advised me to study hard for the examination to get qualified for a government scholarship. I qualified for the government scholarship of Rs.150 per month which was a handsome amount but was just sufficient to meet the expenses of post-graduation at Roorkee.

Because of its old connection with the military, the university was just like a military academy and a very highly disciplined organization. Administration was very strict about attendance and punctuality and progress. The senior most professor who was designated as Dean of Students used to keep a close watch on attendance and punctuality and progress of students and would warn and reprimand erring students.

Total strength of students was only about six hundred. It was a totally residential university. Daily routine of under-graduate students was well planned. Students had to attend lectures in the morning and tutorials in the afternoon. In the tutorials, the tutors helped students to solve engineering problems. There was a tutor for almost every ten students. There were weekly and monthly tests covering the weeks and months syllabus. Students were thus made to concentrate on their studies throughout the year. No wonder, annual results were almost hundred percent.

The university was also particular about extra-curricular activities and entertainment. In the evening attendance at Games was compulsory for undergraduates. They had to learn boating, riding, tennis, squash, badminton etc. by



Marathe Pratishthan

term wise rotation. The university had enough number of courts and coaches and students did not have to wait much for their turns. The university had its own theater and each class was allotted a particular day of the week to watch movies. The university had its own theater and each class was allotted a particular day of the week

After dinner students had to complete their assignments for submission the next morning. On the day allotted for movies, evening used to be free and there were no assignments to be submitted the next day. There was ragging but it was within tolerable limits.

In winter, undergraduates had to wear university blazer with university tie, grey trousers and black shoes and for postgraduate students suit was compulsory, not only in the class rooms but also for all meals. Mess timings were very strictly observed. Entry to the Mess was only in a slot of ten minutes. There used to be oval tables with about twelve chairs and waiter for each table. Use of knives and forks was compulsory.

The university had its own hospital with about ten beds and fully qualified staff. A student feeling unwell had to report to the Medical Officer who would direct the Mess to provide prescribed 'sick diet, and would also recommend exemption from class attendance. When the then president of India had visited Roorkee and inspected the hospital there was no in-patient and the President remarked that he was very happy that the university has such a good facility and the he was happier that there were in in-patients there.

In most of the colleges, not much importance is given to practical training. At Roorkee, Civil Engineering undergraduates were made to prepare mortar and concrete and construct masonry with their own hands. At that time, in our colleges, for practicals in surveying, groups of about ten students were formed and one survey instrument is given to the group. During survey practicals, one or two serious students would take the readings and record the readings and others would spend their time as a picnic. In Roorkee, there used to be groups of two students and one had to take the readings and the other had to record the readings. Thus, students from Roorkee were better trained than their peers from other universities.

At Roorkee old traditions were still in vogue. Post-graduate students had to share a valet between two students at about Rs. 40 per month. Mess Food was very rich and delicious and

Mess bill used to be about Rs.80 per month. scholarship of Rs.150 per month which though was a handsome amount, was just sufficient to meet monthly expenses.

Convocation used to be a Grand Ceremony. Guest at the convocation generally used to be the President or Vice-president of India, Governor or Chief Minister of Uttar Pradesh. Every student received the degree at the hands of the chief guest. To make the ceremony spectacular, a dress-rehearsal was held on the previous evening and only those students who attended the dress-rehearsal could receive their degree at the hands of the chief guest. Each recipient of the degree was allotted a chair with a number. Three circles were marked in front of the dais. Three students as per their serial number were to stand in front of the dais. After announcement of his name, the student from the first circle would go up the steps, shake hand with the Guest, receive his degree, shank hand again, turn around, walk down the steps and stand in front of the dais in the area marked for taking the oath. The oath was administered by the Guest, group-wise.

The university was highly considerate in attending to the problems of students. In case of any problems, students could easily approach any top officer including the vice-chancellor of the university. Many of the post-graduate students like me were dependent on scholarship which was funded by the University Grant's Commission. Postgraduate courses were in two steps. The first year, led to a Post Graduate Diploma to qualify for submitting a dissertation for the Masters Degree. Thereafter, acceptance of dissertation led to the Master's Degree. While I was doing my post-graduate diploma, we did not receive our scholarship money almost for nine months due to procedural delays at the University Grant's Commission. When we approached the registrar, he told us that he would grant us time for payment of our mess bills and examination fees till the scholarship money was received. We were allowed to appear for our examinations and even the results were declared. However, as per Government Rules, we would not be able to receive our diplomas at the Convocation. He admitted that we were getting harassed for no fault of ours and he therefore directed the deputy registrar to go and sit in Delhi and return with the scholarship money. This worked and after about ten days, he returned with our scholarship money and our convocation was smooth.

The students had to complete their dissertation at the university under the supervision of a guide. When I had almost completed preparation of my dissertation, I got a very lucrative offer from Tata Power. It was too good to



Marathe Pratishthan

give a go bye. With the help of my guide, I got a special permission from the University to complete my dissertation while working with Tata Power at their project site near Pune. It helped me to complete my post-graduation while earning.

When I joined the post-graduation course at Roorkee, I had just come out of graduate course from Poona University. Post-graduation was a very different experience. Initially I had some difficulty in getting used to the strict regimentation, Post-graduates did not have tutorial classes and games were not compulsory. Lectures were mainly in the form of guidance and we had to a lot of reading at the well equipped library. We had frequent group discussions and seminars where we had to present papers on allotted subjects. Papers in the examinations did not have any direct questions and were in the form of debatable topics. Therefore, unless a student had really studied the subjects in depth, it was difficult to answer. All standard reference books also used to be available in the examination hall.

Such was the University of Roorkee. Though the management was very strict, it took good care of the students, imparted them excellent education, developed them not only in academics but also in sports, gave them practical training, treated them like officers and trained them to be and behave like officers and that is what made me one.

My stay at Roorkee was only for about 18 months during the years 1959 and 1960. All the description in the article pertains to that period. University of Roorkee has now become Indian Institute of Technology Roorkee. I have not had any occasion to visit Roorkee thereafter. By now five decades have passed and things may have changed a lot.

the Life of Late Smt. Ramabai and largely based on my father's book. My mother is from Kurlekar Family. Late Smt. Ramabai was her fathe's father's sister.

Most of the persons for our Vidwans Clan are either Engineers or directly or indirectly connected with the field of engineering. My father's great-grandfather – Late Mahadev Vyenkatesh Vidwans became an engineer in the year 1850. He was one of the first five persons selected by the British Administration to be trained as engineers and worked with the then Public Works Department. However, my father and his father were exceptions.

I had my basic education in the Nutan Marathi Vidyalaya and college education up to Intermediate Examination in Science in the Nowrosjee Wadia College at Pune. Thereafter, I did my Bachelor of Engineering from Walchand College of Engineering, Sangli and my Degree Master of Engineering from the University of Roorkee. Thereafter, while serving with the Hindustan Construction Co. Ltd., at Mumbai, I attended a three years part-time

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**
३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

## नाते औषधांशी

*आयुष्याचे नाते जडले आता औषध गोळ्यांशी।*
*जीवन जगणे आले करीत मैत्री तयांशी ।।*
*उठल्यापासून सुरू होतो रतीब गोळ्यांचा।*
*झोपेपर्यंत सतत राहतो मारा तयांचा।।*
*नशीब आमचे काही तास झोपेमधे जातात।*
*नाहीतर मारा झाला असता त्याही तासात।।*
*प्रात:काली घ्यावी लागते गोळी पित्ताची।*
*त्यानंतर सुरुवात होते नवीन दिवसाची।।*
*चहाची तल्लफ भागवितो 'बिगर साखरेने'*
*नाही आली चव तर येते चव शुगर फ्रीने।।*
*स्नानानंतर घेतो गोळी बी.पी.ची।*
*घ्यावी लागते नियमित ती गरज आरोग्याची।।*

*थोडे फार फिरणे झाले तर वेळ येते जेवणाची*
*टेबलावर येण्याआधी घेतो गोळी डायबेटिसची।।*
*नियमित घेतली नाही तर वाटते भीती इंजेक्शनची।*
*सुगरण माझी पत्नी स्वयंपाक अतिरुचकर*
*जेवण जास्त झाले तर असते औषध त्यावर।।*
*वामकुक्षी नंतर येते आठवण गुडघ्यांची*
*त्यासाठी घेतो गोळी रामदेव बाबांची*
*रात्रीचे जेवण घेतो लवकर संध्याकाळी*
*झोपण्याआधी घेतो चूर्ण त्याचा उपयोग प्रात:काली*
*दिवस असा संपतो औषधांच्या संगतीत*
*काळ उर्वरित कंठणे आहे असा आनंदात*

**- वि. म. मराठे (पृ.२३५)**
पद्मश्री, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५.
दूरध्वनी : ०२३३- २३०००७२ भ्रमणध्वनी :९४२०६७८९६५



Marathe Pratishthan

ॐ

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दिनांक १२-१-८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
दूरध्वनी : २४३०२४५३ * फॅक्स : ९१-०२२-२४३७९८६३ * e-mail : maratheparivar@yahoo.com

**३० वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके :** १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२
**वार्षिक सर्वसाधारण सभा :** शनिवार १५ सप्टेंबर, सकाळी १० वाजता
**सभास्थान :** लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, खोपट, ठाणे (प.)

## विश्वस्त मंडळ

| | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृप्र |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२५५२४ | ठाणे, प. | २७७ |
| २. श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ०२५१-२५७०६७७ | डोंबिवली- पू. | २९२ |
| ३. श्री. विनायक केशव मराठे | विश्वस्त | २४३०३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ४. श्री. वामन गणेश मराठे | विश्वस्त | २८२६९४०२ | जोगेश्वरी, पू. मुंबई | ५०३ |
| ५. श्रीमती सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४६३०५८ | माहिम, मुंबई | ३९९ |

## कार्यकारी मंडळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त- कार्याध्यक्ष | २५४२५५२४ | ठाणे, प. | २७७ |
| २. श्री. रमाकांत माधव विद्वांस | उपाध्यक्ष | २४३०५२६० | माटुंगा, मुंबई | ६२३ |
| ३. श्री. मोहन सदाशिव मराठे | कार्यवाह | २४४६४३५१ | खार,प. मुंबई | ३६५ |
| ४. श्री. हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ०२५०-२४३३०३८ | नालासोपारा | ०२१ |
| ५. श्री. प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२ |
| ६. श्री. लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २५६८०१०४ | मुलुंड, पू. मुंबई | ५२० |
| ७. श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २६८३६९९४ | अंधेरी, पू. मुंबई | ६७६ |
| ८. श्री. चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५५३९० | परळ, मुंबई | २२२ |
| ९. सौ. आदिती यशवंत मराठे | सभासद | २४४४९२७४ | माहीम, मुंबई | ३९९ |
| १०. सौ. वर्षा शरद मराठे | सभासद | २८४१६७८७ | गोरेगाव, मुंबई | ०२१ |
| ११. डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| १२. श्री. अरुण दत्तात्रेय मराठे | सभासद | ०२०-२४४७३२८१ | पुणे | ०६१ |
| १३. सौ. नीलांबरी रमेश मराठे | सभासद | ०२०-२४४५६२७० | पुणे | २८० |
| १४. श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त (कायम निमंत्रित) | ०२५१-२५७०६७७ | डोंबिवली- पू. | २९२ |
| १५. श्री. यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २४४४९२७४ | माहीम, मुंबई | ३९९ |
| १६. श्री. सुरेश मराठे | कायम निमंत्रित | ०२५१-२४९४९५७ | डोंबिवली, पू. मुंबई | ५०३ |

**बँकर्स : १. सारस्वत बँक, प्रभादेवी, मुंबई * २. युको बँक, टिळक रोड, पुणे**

## ३०वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके (१ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२)

सभासद बंधू भगिनींनो,

मराठे प्रतिष्ठानचा दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजे ३० वा वार्षिक अहवाल सादर करण्यास कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

**सभासद :** अहवाल सालात सदस्य संख्या १४३६ झाली. हितचिंतक संख्या ९, आश्रयदाता संख्या २१ राहिली. सन्माननीय सदस्य संख्या

Marathe Pratishthan

(-) राहिली. या वर्षीच्या सर्व नवीन सदस्यांचे मराठे प्रतिष्ठान स्वागत करीत आहे.

'हितगुज'ची तहहायत वर्गणीदार संख्या ११३२ इतकी आहे.

प्रतिष्ठानने केलेल्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला ही आनंदाची बाब आहे. प्रतिष्ठानचे हितगुज मुखपत्र अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. ते आणखी चांगले करण्यात संपादिका सौ. सुमेधा प्रभाकर मराठे सतत प्रयत्नशील आहेत; परंतु आर्थिक गणित पैकीच्यापैकी गुणांनी सुटण्यासाठी आणखी भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे.

मराठे प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यत्वासाठी प्रत्येक सज्ञान स्त्री-पुरुष व्यक्तीने किमान ५००रु. शुल्क पाठवावे व प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंब प्रमुख सदस्याने रु.२०००/- 'हितगुज' तहहयात शुल्क मराठे प्रतिष्ठानकडे पाठवावे.

**टीप :** आजीव सदस्यत्व त्या व्यक्तीच्या हयातीपर्यंत असते. त्या व्यक्तीच्या निधनानंतर पुढील कुटुंब प्रमुखाने आजीव सदस्यत्व तसेच हितगुज तहहयात शुल्क भरावयाचे असते.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :** मराठे प्रतिष्ठानची २९वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २५ सप्टेंबर, २०११ ला सकाळी १० वाजता अखिल भारतीय कीर्तन संस्था, विठ्ठल मंदीर हॉल, डी. एल. वैद्य रोड, दादर, मुंबई येथे भरली. मागील वार्षिक सभेच्या तुलनेत उपस्थितीत लक्षणीय वाढ झाली. ३०व्या वार्षिक सभेत ह्यापेक्षाही वाढ होईल ही अपेक्षा.

श्री. मंदार भावे, चार्टर्ड अकाउंट यांची हिशेब तपासनीस म्हणून वार्षिक १०००रु. मानधनावर निवड झाली. माननीय अध्यक्षांनी प्रतिष्ठानच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. आणि वास्तुप्रकल्पाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असे सांगितले. गुणवत्ता पारितोषिके घ्यायला विद्यार्थी येत नाहीत अशी खंत व्यक्त केली. प्रतिष्ठानकडील निधी वास्तूप्रकल्पासाठी उपयोगात आणावा ह्यास उपस्थितांची संमती दिली. कार्यवाहांनी कर्नाटकात मराठे प्रतिष्ठानची शाखा १८-२-२०१०ला स्थापन झाल्याचे सांगितले. श्री. गोविंदराव मराठे अध्यक्ष व श्री. अनंत वामन मराठे उपाध्यक्ष झाले.

## : अहवाल वर्षातील ठळक घटना :

१. चि. अमोघ रविंद्र मराठे (पृ. क्र. २८२) - एस.एस.सी. परीक्षेत ९८.५५% गुणांनी उत्तीर्ण. तो मालाडच्या यशोधाम गोकुळधाम शाळामध्ये पहिला आला. त्याला महाराष्ट्र राज्य स्तरावर ४०० मी. धावणे ह्या प्रकारात ब्रॉंझ मेडल मिळाले.

२. चि. श्रेयस शरद मराठे (पृ. २१) गोरेगाव, मुंबई याला शालांत परीक्षेत ९५.८२% गुण मिळाले. मराठे प्रतिष्ठानचे सहकार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे ह्यांचा श्रेयस हा पुतण्या आहे.

३. कु. सोनल सुरेश मराठे बी. कॉम. पदवी परीक्षा (मुंबई विद्यापीठ) प्रथम श्रेणीत ७४% गुण मिळाले श्री. सुरेश मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणी सदस्य असून ठाण्यात हितगुज अंकाचे वाटप स्वत: करतात.

४. चि. अद्वैत अतुल मराठे, मार्च २०११ च्या दहावी परीक्षेत ७३% गुण मिळाले. जन्मत: अंध असूनही त्याने हे लेखनिकाच्या मदतीने सुयश प्राप्त केले.

५. श्री. अजित मराठे - निर्माण ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक यांना 'ब्रँड इक्वीटी मॅनेजमेंट इन रियल इस्टेट बिझिनेस इन मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन' ह्या विषयात मुंबई विद्यापीठाने पीएचडी. दिली आहे.

६. सौ. ज्योती मिलिंद आपटे (वसंत रघुनाथ मराठे, पुणे ह्यांची कन्या) ही मास्टर ऑफ काउन्सेलिंग अँड सायको थेरपी ही पदवी पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन मिळवली आहे.

७. श्री. सुशांत मराठेचे शतक श्री. हेमंत महादेव मराठे ह्यांचे चिरंजीव सुशांत ह्यांनी मुंबई संघाच्या रणजी एलिट अ गट लढतीत -यष्टीरक्षक-फलंदाज-झटपट शतक झळकावले. रणजी सामन्यातील सुशांतचे हे दुसरे शतक आहे.

८. कु. शरयू जाखोटिया - सौ. मंजिरी मराठे (पृ.१२८) व डॉ. गिरीश जाखोटिया ह्यांची सुकन्या हिने मायामी (अमेरिका) विद्यापीठात एम.बी.ए साठी ऑगस्ट २०११ प्रयाण केले. ती बायोमेडिकल इंजिनिअरिंग परीक्षा डिस्टिंक्शन मिळवून उत्तीर्ण झाली.

९. डॉ. चिंतामणी रामचंद्र मराठे (पृ. ४१) ह्यांना गीता धर्म मंडळ पुणेतर्फे आयोजित केलेल्या 'लोकमान्य टिळक ह्यांच्या गीतारहस्याचा संदेश' ह्या विषयावरील निबंध स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळाले.

१०. सौ. नीता सोमठाणकर बदलापूर - सौ. नीलिमा विद्वांस ह्यांची सुकन्या हिने झी मराठीच्या होममिनिस्टर कार्यक्रमात सर्व बक्षिसे व पैठणी जिंकली.

११. श्री. एम. एल. देशपांडे (पृ.६२३) - सौ. शोभा (विद्वांस) ह्यांचे पती ह्यांना संगीत नाटक अकादमीने डिसेंबर २०११ मध्ये टागोर



Marathe Pratishthan

अकादमी पुरस्कार देऊन गौरविले (मानपत्र - महावस्त्र व एक लाख रुपये)

१२. डॉ. गिरीश जाखोटिया (सौ. मंजिरी मराठे (पृ.१२८) चे पती) ह्यांना चला बदल घडवू या पुस्तकाला नागपूरचा पद्मगंध प्रतिष्ठान पुरस्कार मिळाला आहे.

**सहवेदना**

१. श्री. वि. गो. उपाख्य भाऊसाहेब मराठे ह्यांचे अमेरिकेत निधन झाले.

२. श्री. विष्णू श्रीधर मराठे (पृ.१२०) ह्यांचे मंगळवार दिनांक २८ जून २०११ला पुणे येथे दु:खद निधन झाले.

३. श्री. कृष्णा दिनकर उर्फ बबन मराठे (७५) ह्यांचे २६ जुलै २०११ रोजी वेंगुर्ले येथ दु:खद निधन झाले.

४. श्री. नारायण मराठे (पृ.१८). ह्यांचे ३० ऑगस्ट २०११ला कल्याण येथे दु:खद निधन झाले.

५. सौ. रोहिणी प्रकाश विद्वांस (पृ.६४५) (वय ६४) यांचे १२-१०-२०११ ला अहमदाबाद येथे दु:खद निधन झाले.

६. सौ. शुभदा श्रीधर मराठे (पृ. ३९६) ह्यांचे २६-८-२०११ला वेंगुर्ला येथे दु:खद निधन झाले.

७. श्री. अरविंद महादेव चक्रदेव (पृ.७३२) ह्यांचे नेपाळ सहलीहून परतताना काठमांडू येथे अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले.

८. श्रीमती सुनिति चिंतामण मराठे (वय ८०) ह्यांचे १८-११-२०११ रोजी आडेली येथे दु:खद निधन झाले.

**- मोहन मराठे, कार्यवाह, खार (पृ.३६५)**

# आई आणि साठीच्या दिवसाचा संवाद

**श्री. महेश मराठे यांच्या मातोश्री सौ. मीना मोहन मराठे**
**यांच्या साठीशांतीच्या कार्यक्रमाच्या निमित्त त्यांच्या चिरजिवांनी कविता केली**

*रोजच्यासारखाच उगवतो साठीचा दिवस*
*म्हणतो कसा! काम सोडून आता स्वस्थ बस.*
*नको ती घाई, नको ती धावपळ*
*आता थांबव थोडी मनाची चळवळ ।।१।।*

*आता ऐक, मनाच्या आतल्या आवाजाची हाक*
*आणि हृदयाच्या अंतरातून येउंदे नि:शब्द जाग*
*कोणी काही विचारल तरच सांग गूज अंतरीचं*
*नाहीतर सर्वकाळ ओठी राहू दे नाव परमात्म्याचं ।।२।।*

*आजपर्यंत सर्वत्र मारलीस, तू उंच गगनभरारी*
*आता एकदा तरी कर, तू पंढरीची वारी*
*आई म्हणजे फक्त, केवळ काया नाही*
*हे जाणल्याशिवाय तुझ्या मायेचं प्रेम कळणार नाही ।।३।।*

*होय रे बाबा, तुझं म्हणणं अगदी बरोबर*
*बोनस आयुष्यात आता सावली बनून राहते घरभर*
*उमलत्या फुलाप्रमाणे वैचारिक सुगंधाचा देते दरवळ*
*सगळ्यांच्या प्रेमात आकंठ बुडून नि:शब्द होते क्षणभर ।।४।।*

**- महेश मराठे**

८९२/ब, राणीलक्ष्मी मंडळ, पहिला मजला, नागनाथपाराच्यापुढे, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० भ्रमणध्वनी : ९५५२३८४९०८



Marathe Pratishthan

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT,1950
SCHEDULE VIII
[VIDE RULE 17 (1)]

NAME OF THE PUBLIC TRUST : **MARATHE PRATISHTHAN** REG. NO. E-7918 (BOM)

INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED : **31ST MARCH, 2012**

| **EXPENDITURE** | **RS.** | **RS.** | **INCOME** | **RS.** | **RS.** |
|---|---|---|---|---|---|
| To Audit Fees | | 2,247.20 | By Intersest on Fixed Deposits | | 20,160.22 |
| To Expenditure on the objects of Trust | | | By Interest on Saving Bank Account | | |
| Mumbai Mukya Karyalaya Expeneses | | | With Saraswat Co-op Bank, Worli | 1,773.00 | |
| Annual Meeting Expenses | 15,100.00 | | With UCO Bank, Pune | 7,800.00 | 9,573.00 |
| Postage & Distribution | 620.00 | | | | |
| | | 15,720.00 | By Hitguj Prakashan Income | | |
| Kulsammellan Expenses | | | Advertisements | 4,950.00 | |
| Kulsammellan Function | 24,650.00 | | Subscription from Members | 19,351.00 | |
| Honorarium | 2,420.00 | | Transfer From Hitguj Nidhi | 71,540.78 | 95,841.78 |
| Rent | 8,100.00 | 35,170.00 | | | |
| Pune Vardhapan Din Expenses | | | | | |
| Printing, Distribution Etc. | | 1,481.00 | By Receipt From Sale of Kulvritant | | 800.00 |
| To Hitguj Praskashan Expenses | | | By Kulsammellan Income | | |
| Hitguj Printing (Mumbai Head Office) | 64,641.00 | | Subscription From Members | | 29,950.00 |
| Hitguj Postage (Mumbai Head Office) | 29,380.00 | | | | |
| Hitguj Postage (Pune Branch) | 5,138.00 | 99,159.00 | | | |
| To TDS Receivable return off | | 14,412.00 | | | |
| To Income Tax | | 3,890.00 | | | |
| To Income & Expenditure Account | | | | | |
| Surplus Being Excess of Income | | | | | |
| Over Expenditure C/F To Balance Sheet | | | | | |
| | | (15,754.20) | | | |
| | **TOTAL** | **1,56,325.00** | | **TOTAL** | **1,56,325.00** |

Note : The Headings as per the Prescribed
Form which are absent in the above
Statement Should be read As 'NIL'

**For MARATHE PRATISHTHAN**

TRUSTEE TRUSTEE

Subject to our report of Even Date
**For HMA & Associates**
**Chartered Accountants**

Partner
Membership No. 103650
MUMBAI DATED 16-08-2012

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950**
**SCHEDULE VIII**
**[VIDE RULE 17 (1)]**

NAME OF THE PUBLIC TRUST : **MARATHE PRATISHTHAN** **REG. NO. E-7918 (BOM)**

**BALANCE SHETT AS AT... : 31ST MARCH, 2012**

| **FUNDS AND LIABITLIES** | **RS.** | **RS.** | **PROPERTY AND ASSETS** | **RS.** | **RS.** |
|---|---|---|---|---|---|
| **Kayam Nidhi** | | | **Investments** | | |
| Balance as per Last Balance Sheet | 1,88,395.00 | | Fixed Deposits With | | |
| Add : Donation | 5,000.00 | | Saraswat Co-op. Bank, Worli | 1,97,851.00 | |
| | | 1,93,395.00 | Cosmos Co-op. Bank, Dadar | 1,65,000.00 | |
| | | | Janata Sahakari Bank, Dadar | 1,82,542.00 | |



Marathe Pratishthan

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **TOTAL B/F** | **1,93,395.00** | | **TOTAL B/F** | **-** |
| **Kulvruttant Nidhi** | | | Jan Kalyan Sah. Bank, Dadar | 75,000.00 | |
| Balance as per last Balance Sheet | 20,650.00 | | Jan Kalyan Sah. Bank, Shivaji Park | 1,10,000.00 | |
| Add : Interest | 1,607.67 | 22,257.67 | Jan Kalyan Sah. Bank, Sion | 2,97,749.30 | |
| | | | UCO Bank, Pune | 8,17,563.00 | |
| | | | U.T.I. - C.R.T.S. | 59,000.00 | 19,04,705.30 |
| **Shikshan Nidhi** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 5,62,000.00 | | | | |
| Less : Used | (34,000.00) | | Interest Receivable | | |
| | 5,28,000.00 | | | | |
| Add : Interest | 43,753.46 | 5,71,753.46 | On Fixed Deposits With | | |
| | | | Jan kalyan Sah. Bank Ltd., Sion | 49,039.00 | |
| | | | UCO Bank, Pune | 74,625.62 | 1,23,664.62 |
| **Sureshbhau Smruti Nidhi** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 83,654.00 | | | | |
| Add : Interest | 6,512.73 | 90, 166.73 | **T. D.S. Receivable** | | |
| | | | For 1998-1999 | 2,262.00 | |
| **Udyog Pravartan Nidhi** | | | For 1999-2000 | 4,968.00 | |
| Balance as per last Balance Sheet | 65,820.00 | | For 2000-2001 | 2,188.00 | |
| Add : Interest | 5,124.29 | | For 2001-2002 | 2,296.00 | |
| | | 70,944.29 | For 2002-2003 | 2,002.00 | |
| | | | For 2003-2004 | 696.00 | |
| | | | For 2011-2012 | 938.00 | |
| | | | | 15,350.00 | |
| | | | Less : Written off | 14,412.00 | 938.00 |
| **Vishishta Hetu Nidhi** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,82,272.00 | | | | |
| Add : Interest | 14,190.45 | 1,96,462.45 | **Cash and Bank Balances** | | |
| | | | Cash on Hand with | | |
| | | | Mumbai Office | 1,995.00 | |
| **Yuva Manch Nidhi** | | | Pune Branch | 33,465.50 | 35,460.50 |
| Balance as per last Balance Sheet | 1,686.00 | | | | |
| Add : Interest | 131.26 | 1,817.26 | Cash at Bank with | | |
| | | | Saraswat Bank Ltd., Worli | 21,863.85 | |
| **Udyojakta Paritoshah Nidhi** | | | UCO Bank, Pune | 76,530.18 | 98,394.03 |
| Donations During the Year | 22,680.00 | | | | |
| Add : Interest | 1,765.71 | 24,445.71 | | | |
| | | | Loan From Shikshan Nidhi | | |
| **Vaidyakiya Madat Nidhi** | | | Ravindra R. Khambete | 20,000.00 | |
| Balance as per last Balance Sheet | 42,676.00 | | Preeta Karmarkar | 10,000.00 | 30,000.00 |
| Add : Interest | 3,322.46 | 45,998.46 | | | |
| | | | Loan From Pravartan Nidhi | | |
| **Hitguj Nidhi** | | | Mohan Marathe, Sangali | | 10,000.00 |
| Balance as per last balance Sheet | 3,01,706.92 | | | | |
| Add : Donation (Pune) | 6,401.00 | | Mukund Marathe, Pune | | 13,000.00 |
| Add : Interest | 23,489.47 | | | | |
| Less : Transfer to I & E A/c | (71,540.00) | 2,60,056.61 | | | |
| **Vinay Khambete Smruti Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 78,683.00 | | | | |
| Add : Interest | 6,125.72 | 84,808.72 | | | |
| **Anita Khambete Smruti Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 15,607.00 | | | | |
| Add : Interest | 1,215.06 | | | | |
| | - | 16,822.05 | | | |
| **Ganesh Tantric Shikshan Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 25,870.00 | | | | |
| Add : Interest | 1,698.05 | 27,884.06 | | | |

Marathe Pratishthan

| | | TOTAL C/F | 16,06,812.47 | | TOTAL C/F | 22,16,162.45 |
|---|---|---|---|---|---|---|
| **Hindi Paritoshik Yojana** | | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,583.00 | | | | | |
| Add : Interest | 123.24 | 1,706.24 | | | | |
| **Vaidik Shikshan Yojana** | | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 21,811.00 | | | | | |
| Add : Interest | 1,698.05 | 23,509.05 | | | | |
| **Shourya Paritoshik Yojana** | | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,668.00 | | | | | |
| Add : Interest | 285.57 | 3,953.57 | | | | |
| **Pune Dainandini Yojana** | | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,48,421.00 | | | | | |
| Add : Interest | 11,555.04 | 1,59,976.04 | | | | |
| **Kalasammellan** | | | | | | |
| Donation during the year | 6,000.00 | 6,000.00 | | | | |
| **Building Fund (Pune)** | | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,00,414.00 | | | | | |
| Add : Donations | 35,353.00 | | | | | |
| Add : Interest | 7,817.55 | 1,43,584.55 | | | | |
| **Current Liabilities & Provisions** | | | | | | |
| Audit Fees | 3747.20 | | | | | |
| Contribution to Charity Comm. | 6,180.00 | | | | | |
| Bakshis Anamat | 2,750.00 | 12,677.20 | | | | |
| **Income and Expenditure Account** | | | | | | |
| Balance as per Last Balance Sheet | 2,73,697.53 | | | | | |
| Add : Surplus being excess of Income over Expenditure | (15,754.20) | 2,57,943.33 | | | | |
| | **TOTAL** | **2,216,162.45** | | **TOTAL C/F** | **2,216,162.45** | |

Subject to Our Report of Even Date

Note : The Headings as per the prescribed Form which are absent in the above Statement should be read as 'NIL'
**For Marathe Pratishthan**

The above Sheet to the best of our belief contains a true account of the Funds and liabilites and of the property & Assets of the Trust

**For HMA & Associates**
**Charterd Accountant**

**Trustee** **Trustee**

Memebership No. 103650
Mumbai, Date 16-08-2012

## सहवेदना

कै. श्री. गणेश परशुराम मराठे (पृ.१८) कल्याण ह्यांचे दिनांक १४ जून २०१२ ला वार्धक्याने निधन झाले. कै. नारायणराव मराठे यांचे ते भाऊ होते, तर श्रीमती सुहासिनी नारायण मराठे यांचे ते दीर होते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. गणेश परशुराम मराठे यांना विनम्र श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांना दु:खाला सामोरे जाण्याचे बळ देवाने द्यावे. कुटुंबियांच्या दु:खात मराठे प्रतिष्ठान सहभागी आहे.

## साभार पोच

**'शब्दविभोर'** संकलिका : सौ. मीना महेश मराठे, प्रकाशक : शुभ क्रिएशन, पुणे मूल्य :७५/-

Marathe Pratishthan

## अधिक मासाविषयी : थोडेसे अधिक

सौ. गायत्री गणेश जोशी (पृ. ६७६)


चांद्रवर्ष व सौरवर्ष यांचा मेळ घालण्यासाठी एक अधिक महिना धरावा लागतो त्याला 'अधिकमास' असे म्हणतात. सुमारे तीन वर्षांनंतर अधिकमास येतो. याला मलमास, पुरुषोत्तम मास, धोंडामास असेही म्हटले जाते. (उपरोधिक म्हण आहे. दुष्काळात तेरावा महिना.)

भाद्रपदापर्यंतच्याच मासांना अधिक मास म्हणतात. मार्गशीर्ष, पौष, माघ कधीही अधिक महिने नसतात. अश्विन व कार्तिक अधिक आले तरी त्यास अधिक म्हणत नाहीत. ज्या वर्षी अश्विन अधिक होतो त्या वर्षी पौष 'क्षय मास' होतो. अशावेळी दोन प्रहरापर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहरांनंतर पौष मास मानून दोन्ही मासांतील धर्मकृत्ये एकाच महिन्यात करतात. या जोडमासाला 'संसर्प' असे म्हणतात. कार्तिकापुढील चार महिने अधिक मास होत नाहीत व अश्विनाच्या पूर्वी क्षयमास होत नाही.

दोन अधिक मासात कमीत कमी २७ महिन्यांचे तर जास्तीच जास्ती ३५ महिन्यांचे अंतर असते. अधिक मास: चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे १२ वर्षांनी येतात. आषाढ १८ वर्षांनी अधिक येतो तर भाद्रपद अधिक मास २४ वर्षांनी येतो. अश्विन अधिकमास १४१ वर्षांनी येतो. मात्र कार्तिक मास अधिक येण्यासाठी ७०० वर्षे लागतात. अधिक मासात ३३ या संख्येला महत्त्व असल्याने दानधर्म करताना ३३चा विचार होतो. जावयाला दान देणे पुण्यप्रद. सहस्रचंद्र मोजताना अधिक मासांची गणना महत्त्वाची ठरते.

'अधिकस्य अधिकं फलं' हे सर्वश्रुत आहे.

**- सौ. गायत्री गणेश जोशी (खांबेटे),**
अ/४ स्वाती बिल्डिंग, अमृतकुंभ को. ऑप. हो. सोसायटी, भवानीशंकर रोड, चितळे पथ, दादर, मुंबई ४०००२८.
दूरध्वनी : ०२२-२४३६१६८५ मोबाईल नं. : ९८६९३३५५३६०



### मानसन्मान

उज्ज्वल गिरीश जाखोटिया (मराठे) (पृ.१२८) हा यावर्षीच्या शालांत परीक्षेत ९१% गुण मिळवून उत्तीर्ण झाला. त्यानंतर त्याला इंजिनिअरिंग करण्याची इच्छा आहे. त्यासाठी तो आयआयटी प्रवेश परीक्षेची तयारी करत आहे.

कुमार उज्ज्वलचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा!

सौ. मंजिरी मराठे (पृ.१२८) यांचा उज्ज्वल मुलगा आहे.



### मानसन्मान

वरदा अभिजीत काणे (पृ. ६७६) हिला पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती इयत्ता ४ थी परीक्षेत वरदाला ३०० पैकी २६४ गुण मिळाले. मुंबईत गुणानुक्रमे ती सोळावी आली. वरदा पार्ले टिळक विद्यालयात शिकत आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. वरदाचे हार्दिक अभिनंदन! पुढेही असेच यश मिळो या सदिच्छा व शुभाशिर्वाद.

(कुमारी वरदा ही सौ. गायत्री गणेश जोशी (पृ.६७६) पूर्वाश्रमीच्या विजया गोपाळ खांबेटे यांची नात आहे.)



### मानसन्मान

चि. अथर्व सुनील विद्वांस (पृ.३८३) हा इयत्ता ४ थीच्या पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा २०१२ यात पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम शाळेत पहिला व मुंबई बोर्डात नववा आला आहे. त्याला ३०० पैकी २७८ गुण मिळून १९७७मुलांमध्ये तो नववा आला आहे. चि. अथर्वला क्रिकेटची तसेच पोहण्याचीही खूप आवड आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अथर्वचे हार्दिक अभिनंदन! पुढेही असेच यश मिळो या सदिच्छा व शुभाशिर्वाद.

**मराठे प्रतिष्ठानचे आजीव सभासद व्हा. 'हितगुज'चे वर्गणीदार व्हा.**

Marathe Pratishthan

# संपूर्ण भारत : सायकल प्रवास

**विंग कमांडर (नि.) यशवंत मराठे**

भारतीय वायू सेनतील (आयएएफ) माझा प्रवेश हा माझ्या आयुष्यातील सुवर्णक्षण होता म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. बेंगरूळू येथील वायूसेना अभियांत्रिकी विद्यालयातून अधिकारी म्हणून झालेल्या पासिंग परेडमध्ये चार पदकांपैकी तीन पदके प्राप्त झाली. याचा मला सार्थ अभिमान वाटतो. वायुसेनेतील कार्यकाल माझ्यादृष्टीने अतिशय आनंददायी होता. सेवेतून निवृत्त होण्याअगोदर वायुसेनेच्या सर्वोच्च प्रमुखांकडून माझा दोन वेळा गौरव करण्यात आला. त्याची स्मृती आजही माझ्यासाठी प्रेरणादायी आहे.

निवृत्तीनंतर काय? ब्राह्मण समाजातील व्यक्तीला स्वतंत्र व्यवसाय जमत नाही असा सर्वशृत गैरसमज होता. तथापि मोठ्या जिद्दीने पुण्यासारख्या शहरात विद्युत उपकरणाच्या व्यवसायात मी स्वत:ला झोकून दिलं. माझ्या व्यवसायात चांगली प्रगती होण्याचा तो काळ होता. दहा वर्षांच्या व्यवसायातील अथक परिश्रमामुळे हृदयरोगासारख्या व्याधीमुळे मुंबई येथील 'हिंदुजा रुग्णालया'त मला दाखल व्हावं लागलं. मोठी शस्त्रक्रियाही करावी लागली. या घटनेनं मात्र मी अंर्तमुख झालो. आणि विचारांती ठरविलं की आपली जीवनशैली बदलून टाकायची. नव्या जीवनशैलीचा मी प्रारंभ केला.

लांब लांब पल्ल्यापर्यंत मी चालण्यास सुरुवात केली. पार हिमालय ट्रेकसुद्धा केला. १५,०००फूट उंचीवरील 'हेमकुंड', १६०० फूट उंचीवरील 'छोटा कैलास' ही दोन्ही ठिकाणे माझ्यासाठी चैतन्यमय ठरली. एका सराव ट्रेकमध्ये माझ्या गुडघ्यामध्ये दोष उत्पन्न झाले. आणि उंच उंच पर्वतराजीशी नाती जोडण्याचा माझा छंद मला सोडून द्यावा लागला. आता पुन्हा काय? या वेळेपर्यंत मी वयाची सत्तरी ओलांडली होती.

एक मार्ग संपला की दुसरा मार्ग सापडतो. इच्छाशक्ती असेल तिथे प्रश्नाला उत्तर हे मिळतंच. दिनचर्येचा भाग म्हणून मी हास्य संघ, ज्येष्ठ नागरिक संघ आणि पुणे सायकल प्रतिष्ठान अशा संघटनांशी जवळीक केली. यातूनच एक



नवी ऊर्जा प्राप्त झाली.

सायकल चालविण्याचा आनंद काही वेगळाच वाटू लागला. सायकल चालविण्याचा आणखी एक फायदा मला जाणवू लागला. संपूर्ण शरीराचा भार सायकलीवर असतो -तथापि पाय मात्र मोकळे. त्यामुळे सायकल चालविण्याचे कार्य सोपे वाटू लागले. दिवसातून १०० ते १५० कि.मी. पर्यंत सायकल चालविण्यात मी पारंगत झालो आणि त्यातून मिळणारा आनंद काही वेगळाच.

आमचा सायकल संघ अत्यंत बुद्धिमान आणि नामवंत व्यक्तींचा. डॉ. दिलीप सारडा, डॉ. शिरीष पटवर्धन, श्री. जुगल किशोर राठी, प्रा. सौ. भावे, श्री. मेंहदळे, श्री. उल्हास जोशी, कायदेतज्ज्ञ सौ. परळीकर हे सारे पुणेकर आणि साथीला बडोद्याचे डॉ. भगवतीबेन ओझा, डॉ. स्वाती साठे. सायकल सफरीत या सार्‍यांचा सहवास म्हणजे आनंददायी मैफिलच वाटत होती.

प्रत्येक वर्षाच्या डिसेंबरमध्ये साधारण १० दिवसाच्या सायकल प्रवासाचे आयोजन असायचे. भारतातल्या निरनिराळ्या भागात हा सायकल दौरा आयोजित केला जात असे. 'प्रदुषणमुक्त भारत', 'महिला व बालकांचे स्वास्थ्य सुधार', 'बाल मजुरी मुक्ती', 'उत्तम आरोग्यासाठी सायकल' हृदयरोग मुक्ती अशा अनेक विषयांचे प्रबोधनही या सायकल दौर्‍यातून केले जात असे. इ.स. २००० ते २००७ या काळामधील जवळ जवळ भारताचा निम्मा भाग या सायकल सफरींच्या माध्यमातून मी पूर्ण केला.

त्यानंतर मी स्वत: भारताचा उर्वरित भाग - उदा.- राजस्थान, तामिळनाडू, गुजराथ, मध्यप्रदेश, मध्य महाराष्ट्र इ. ठिकाणी सायकल सफरी आयोजित केल्या. आणि अखेर २०१२ मध्ये उत्तर प्रदेश व 'वाराणशी ते सुंदरवन' हा पश्चिम बंगालचा सायकल दौरा डॉ. दिलीप सारडा यांच्यासमेवते पूर्ण केला. वयाच्या ८१व्या वर्षी संपूर्ण भारत सायकल भ्रमण अभियानाचं माझं स्वप्न मी पूर्ण केलं. याहून आयुष्यातला सुंदर आनंद तो कुठला?

हा संपूर्ण भारत सायकल दौर्‍यात माझ्या मनावर ठसलेले काही अनुभव काही विचार खाली नमूद करताना मला खूप समाधान वाटतं.

१. १८,३०० फूट उंचीवरील लडाखमधील खारदुंगला पर्यंतचा सायकल प्रवास केवळ अद्‌भुतच म्हणावा लागेल.

२. अमृतसर वाघा बॉर्डर या सीमेवर भारत व पाकिस्तान या दोन देशांचे मानचिन्ह असलेले झेंडे फडकताना पाहिले. जालियनवाला बागेस दिलेली भेट व नंतर तेथील स्थानिक डॉक्टरांनी केलेला सत्कार आमच्यासाठी स्मरणीय ठरला.

३. पोरबंदर (गुजराथ) येथीला गांधीजींचे जन्मस्थान आणि त्यांना आदरांजली वाहण्यासाठी स्थानिक लोकांनी आयोजित केलेली सभा आमच्यासाठी एक पवित्र स्मृती ठरली. याचवेळी वडोदरा, राजकोट व पोरबंदर येथे सायकल संघांची स्थापना करण्यात आली. याचं श्रेय डॉ. स्वाती साठे व डॉ. भगवतीबेन ओझा यांना आहे.

४. खजुराहो येथील देवळे, सांची येथील वास्तू म्हणजे भारतीय प्राचीन कला वास्तूरचनेचा एक वस्तूपाठच आहे. सारनाथ व बुद्धगया येथील मंदिरे म्हणजे धार्मिक मूल्यांचा एक आविष्कारच वाटावा. कांचीपूरम, तंजावर, मदुराई, रामेश्वर येथील भव्य मंदिरांची वास्तुरचना म्हणजे भारतीय संस्कृतीचा आणि विद्वत्तेचा एक खजिनाच आहे असं गर्वाने म्हणावं असं वाटतं.

५. कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद व तामिळ कवी तिरुवल्लावूर यांची विशाल सागरात उभी राहिलेली भव्य स्मारकं म्हणजे हिंदू व तामिळ तत्त्वज्ञानाचे एक अधिष्ठानच आहे असे नमूद करताना अभिमान वाटतो.

६. कर्नाटकात सागर किनारी वसलेल्या मुरडेश्वर मंदिरापर्यंतचा सायकल प्रवास हे आमच्यासाठी एक आव्हानच ठरलं. पण तेवढाच आनंददायी आणि नेत्रदीपक.

७. प्रत्येक ठिकाणी स्थानिक लोकांनी केलेला आमचा सत्कार, त्यातील आत्मीयता पुढील प्रवासासाठी प्रेरक ठरत गेली. स्थानिक खासदार, आमदार व मान्यवरांनी केलेलं आमचं कौतुकही प्रेरणादायी होतं. आदरणीय राष्ट्रपती सौ. प्रतिभा पाटील यांनी आमच्यासाठी पाठविलेल्या शुभेच्छा व सायकल प्रवासासाठी दिलेली प्रेरणा शब्दापलीकडील आहे.

**- विंगकमांडर श्री. यशवंत मराठे (पृ.१००)**
स.१६२, रोड ५३, आदर्श कॉलनी,
पुणे ४११ ००५
मोबाईल : ९४२२३६८६५८

## सा. किरातचे संपादक श्रीधर मराठे यांचे दु:खद निधन

सा. किरातचे संपादक किरात मुद्रणालयाचे मालक, किरात ट्रस्टचे अध्यक्ष श्री. श्रीधर केशव मराठे (पृ.३९६) यांचे यकृताच्या आजाराने ७ जून २०१२ रोजी कुडाळ येथील डॉ. रमेश परब यांच्या राजन रुग्णालयात सकाळी अकरा वाजता दु:खद निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात बंधू सुनील, मुलगार ॲड. शशांक, सून सौ. सीमा, नातू चिन्मय, मेहुणे, बहिणी, चुलत बंधू असा परिवार तसेच किरात परिवार आणि किरात मुद्रणालयाचे कर्मचारी आहेत.

सा. किरातचे संवर्धक कै. केशव अनंत मराठे यांच्यानंतर गेली ५० वर्षे त्यांनी साप्ताहिक ‘किरात’ची धुरा सांभाळली. किरात ट्रस्टतर्फे त्यांनी येथे विविध सामाजिक उपक्रमही राबविले. अखंड रत्नागिरी जिल्हा असताना पत्रकार संघाचे ते पदाधिकारी होते. गणपतीपुळे येथे झालेल्या अखिल भारतीय पत्रकार परिषदेच्या अधिवेशनाच्या स्वागत समितीवरही हे होते. पहिल्या जिल्हा पत्रकार संघाचे ते कार्यवाह होते. जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीवर तसेच तालुका पत्रकार समितीचे अध्यक्ष होते. जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीवर त्यांनी काम केले.

उभादांडा येथील न्यू एज्युकेशन सोसायटीचे ते विद्यमान अध्यक्ष होते. डी. बी. पेडणेकर यांच्या भंडारी पतसंस्थेचे सदस्य, वेंगुर्ले नगरवाचनालय, बॅ. खर्डेकर महाविद्यालयाच्या सल्लागार समितीचे सदस्य अशा विविध सामाजिक, शैक्षणिक, स्वयंसेवी संस्थांवर ते कार्यरत होते. या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटविला. त्यांच्या सा. ‘किरात’लाही अनेक पुरस्कार मिळाले होते.

दरम्यान २६ ऑगस्ट २०११ रोजी दहा महिन्यांपूर्वी त्यांच्या पत्नी सौ. शुभदा यांचेही दीर्घ आजाराने निधन झाले. ज्येष्ठ पत्रकार श्रीधर मराठे यांच्या निधनाने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

‘किरात’चा ७५वा आणि दहा वर्षांनी ८५वा वर्धापनदिन मुंबईतील वाचक हितचिंतकांच्या सहकार्याने मुंबईत भव्य प्रमाणात साजरा झाला.

‘किरात’च्या दिवाळी विशेषांकांना अनेक राज्यस्तरीय प्रदर्शनांतून उत्कृष्ट अंक म्हणून तसेच उत्तम संपादनाबद्दल पुरस्कार मिळालेले आहेत. त्याचबरोबर ‘किरात’च्या संपादकांना, श्रीधर मराठे यांना अनेक राज्यस्तरीय, विभागीय आणि जिल्हास्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे प्रतिवर्षी उद्योजक डहाणूकर पुरस्कृत राज्यस्तरीय पत्रकारिता स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत १९८६ साली ‘किरात’मधील ‘कोकण विकास आणि पुणे परिषद’ या संपादकीय अग्रलेखाला काकासाहेब खाडीलकर स्मृती प्रथम पारितोषिक मिळालेले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते हे पारितोषिक देण्यात आले होते. त्याचबरोबर वसई येथील कै. भाऊसाहेब वर्तक प्रतिष्ठानचा कोकण विभागीय २५हजार रु.चा पुरस्कार, पु. भा. भावे स्मृती पुरस्कार, विश्वसंवाद केंद्र या संस्थेचा महर्षी नारद पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा कोकण वैभव पुरस्कार ‘किरात’चे संपादक श्रीधर मराठे यांना मिळालेले आहेत. हे पुरस्कार म्हणजे ‘किरात’च्या कार्याचीच पावती आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्रीधर केशव मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली. मराठे प्रतिष्ठानवर त्यांचा विशेष लोभ होता. ‘हितगुज’ने ही वेळोवेळी त्यांच्या कार्याची नोंद घेतली आहे.

**सज्जन माणूस म्हणून जन्माला येणे हा योगायोग आहे, पण सज्जन म्हणून मरणे आयुष्यराची कमाई आहे.**

Marathe Pratishthan

# पोहणारे वीर : श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे

**- श्री. दत्तात्रय आत्मारा मराठे,**

मुंबई क्रीडा व ललित कला प्रतिष्ठानच्या मुलुंड येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुलाचे जलतरण तलावाचे गेली एकवीस वर्षे मराठे सभासद आहेत. वयाची ८८वर्षे त्यांनी पूर्ण केली आहेत. जिल्हा ते राष्ट्रीय स्तरापर्यंत प्रतिष्ठानचे प्रतिनिधित्व करून त्यांनी अनेक पारितोषिके मिळवली आहेत. त्यांच्या या कामगिरीच्या गौरव महापौर सुनील प्रभू यांनी केला आणि त्यांना मुंबई क्रीडा व ललित कला प्रतिष्ठानचे सन्माननीय वार्षिक सभासदत्व विनामूल्य बहाल करण्यात आले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे यांना हार्दिक अभिवादन.

**TAKING THE PLUNGE!**

I had never realised the passion og having a hobby till I started swimming at the age of 65. It's been 23 years since and it has opened up a whole new world for me.

All through my working life, I sold products like cosmetics, stationery and what have you. When I wasn't working, I spent time with my family. Days and months went by and I kept plodding on, leading a monotonous life. Then my kids got married and they, in turn, had kids. After I retired, I spent a lot of time with my grandchildren. Then, one fine day, I decided to teach my four year-old granddaughter how to swim and instantly memories of learning to swim as a child flooded in. I remembered how much I loved swimming and wondered why I had ever quit. After that, there was no looking back.

Today, at the age of 88, I am a regular swimmer at a pool in Mumbai. In fact, I have been a regular since the pool was inaugurated in 1989; I swim daily from 8 am to 9am. I simply enjoy the feel of water all around me. It's become a habit and I can't do without my daily dose. What a wondeful change.

People at the pool encourage me to pursue my passion, It is very refreshing to have strangers support and encourage me. It isn't every day that you have someone you don't know come up to you, especially in a metro city and show interest in your opinions, Also, young swimmers look to me for guidance and I am more than happy to share everything I can with them.

One thing led to another and I started teaching young children to swim at the pool. Their happy faces give me sheer pleasure and I could ask for nothing else in return, I have also collected so many precious memories along the way. For instance, there was a six year old mentally and physically challenged boy who was learning to swim. I had to be very careful while guiding  him. And when he took to swimming regularly, there were noticable changes in him. It was a warm feeling just to have the child smile back at me.

Swimming has not only done wonders for me mentally and physically, it has also earned me some great friends. I had always assumed that one makes friends when one is young. But swimming has defied many beliefs. When I began swimming I met Prakash Arurkar and now we're swimming buddies. We became good friends over the years and he takes a detour to pick me up and drop me home in his car. He even drives me around for my tournaments.

Yes, I have won quite a few laurels for swimming. I have participatd in National events for senior citizens; won tournaments in Nagpur and Amravati; I have been felicitated at the MIG Club in Mumbai as a senior citizen swimmer and participated regularly at district level events too. Perhaps my greatest achievement is having inspired my 58 years old son to take up swimming. One day I hope to go swimming with my entire family.

- श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे,
ए ७- गरूड सोसायटी, गवाणपाडा, मुलुंड (पू.), मुंबई ४०० ०८१ फोन : ०२२-२५६३५४८७

## मानसन्मान

**कु. मृदुला विश्वेश मराठे,** सांगली (पृ.२३५) हिला महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या मार्च २०१० मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत ८६.८०% गुण मिळाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. मृदुलाचे हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा!



Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

जून २०१२चा ९० वा अंक १३.७.२०१२ रोजी मिळाला, आभार संपादकियात आपण अंकातील लिखाणांचा परामर्श घेऊन कुलबांधवांना हा पावसाळा आरोग्यसंपन्न जावो ह्या सदिच्छेने संपादकीय पूर्ण केले.

पावसाला रोगी म्हणतात म्हणूनच चातुर्मासात उपवासाचे महत्त्व आहे. पूर्वीच्याकाळी धर्मांवर श्रद्धा होती म्हणून धार्मिक वृत्तीने हे का व्हावयाचे. आता विज्ञानाची सांगड घातली तर मुलांना पटते म्हणूनच थोडे लिहावयास घेतले. आपले शरीर वात, पित्त व कफ ह्या तीन विकारांवर चालते, प्रत्येकाचे शरीरात हे तिन्ही विकार असावेच लागतात. फक्त ते सामान्य स्थितीत असले, की प्रकृती बिघडत नाही. ह्या तिन्ही विकारांपैकी एखादा विकार वाढला की आपण अस्वस्थ होतो व प्रत्येकाने आपल्या प्रकृतीचा विचार व्यवस्थित केला तर तब्येत बिघडली असल्यास योग्य उपचाराने, आहार, विहाराने आपण सुसह्य स्थितीत राहू व उत्तम मिळालेल्या मनुष्य जन्माचा लाभ घेऊ. जसे संगीत ऐकताना, ताल, लय, सूर यांचा सुरेख संगम असेल तर गाणे कानाला बरे वाटते, एखाद्या गाण्याला वन्स मोअर मिळते. जसे ऋतूंप्रमाणे आहारविहार केला तर प्रकृति स्वास्थ उत्तम राहते. आपली परीक्षण व निरीक्षण शक्ती आपल्याविषयी उत्तम पाहिजे म्हणजे चिकित्सकाकडे जाण्याची वेळ येणार नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा तिन्हीही कालमानाप्रमाणे व्यवस्थित वेळेत आले व गेले तर संबंध वर्ष उत्तम जाते. तसे प्रकृतीचे मूल्यमापन करून व्यवहार ठेवल्यास आपले स्वत:चे जीवन, त्याबरोबर कुटुंबाचे, त्याबरोबर समाजाचे, शहराचे, राज्याचे व देशाचे जीवनमान उत्तम राहील व त्यालाच रामराज्याची उपमा देता येईल.

उन्हाळा त्यागी, हिवाळा भोगी, पावसाळा रोगी असे म्हणतात ह्यावरून वरील लिखाण लिहावयाचे मनात आले.

प्रा. विश्वास चक्रदेव यांचा गायत्री मंत्र व्याख्या आणि व्याप्ती हा लेख पुष्कळ ज्ञान देणारा आहे. त्यांचा पत्ता अथवा फोन नं. दिल्यास त्यांचे प्रवचन बडोद्यात (प्रवचन/व्याख्यान देत असतील तर) ठेवण्याचा प्रयत्न करीन.

माझी बायपास हा अनुभव प्रत्यक्ष डोळ्यांसमोर चित्रण केल्यासारखा आहे. मी पण माझी कोलोनोस्कोपी व एण्डोस्कोपी हा स्वानुभव लिहून पाठविण्याच्या विचारात आहे योग्य वाटल्यास छापावा, सर सयाजीरावांसारख्या दूरदृष्टी असणारा राजा हिंदुस्थानात दुसरा झालाच नाही. आम्ही नशीबवान की अशा सयाजीनगरीत आमचा जन्म झाला. माणसं ओळखण्याची पारख व जगातले जे नवे ते बडोद्यात आणावयाचे त्यांचे व्रत त्यांच्या नावाची ओळख करून देते. माझ्या माहितीप्रमाणे म्युझिक कॉलेज हिंदुस्तानात दोनच ठिकाणी त्यातील एक बडोद्यात.

सार्वजनिक घड्याळांची टॉवर्स गावोगावी असतील त्यात आकडे रोमन अथवा इंग्रजी पण बडोद्यातील सयाजीगंज टॉवर वर देवनागरी आकडे आहेत हे बडोद्याचे मराठी बाणा जपण्याचे सयाजीरावांचे स्वप्न होते व ते प्रत्यक्षात उतरविले. महाराष्ट्रात कोठे आहे का याची माहिती घ्यावी. बडोद्यातील कोर्टाला न्यायमंदीर असे नाव दिले आहे. फायर ब्रिगेड स्टेशन ला अग्निशमन केंद्र असे नाव बडोद्यात बिल्डिंगला दिले आहे. सयाजीरावांबद्दल हितगुजची पाने अपुरी पडतील.

आपण दरेक लेखकाचे नाव लिहिल्यावर पृष्ठ संख्या लिहितात त्याचा संदर्भ काय आहे. लेखकाने आपला लेख लिहिल्यावर पत्त्याबरोबर एसटीडीकोडसहीत फोननंबर द्यावा ही विनंती.

**- मोहन मराठे, (पृ.४२१)**

C/o. विक्रम एजन्सी, 'समर्थ', शियापुरा, रावपुरा बडोदा (गुजराथ) - ३९० ००१ फोन - ०२६५-२४३०३०

✸✸✸

जून २०१२ चा 'हितगुज'चा अंक मिळाला. अंकामधील अ. द. मराठे यांच्या माझी बायपास या लेखातून त्यांनी बायपास सर्जरीला कसे धैर्याने तोंड दिले व रोगमुक्त झाले याची हकिकत वर्णिली आहे. अनंत रोगांमध्ये रुग्णाची विलपॉवर बरे होण्यासाठी महत्त्वाची असते. आता त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच इच्छा! इतरही सर्व लेख चांगले आहे

श्री. रमाकांत विद्वांस यांचा स्वत:विषयीचा लेख मला विशेष करून आवडला. त्यांनी आपल्या अभियंत्याच्या कारकिर्दीत निरनिराळी आव्हाने कशी स्वीकारली हे वाचून आनंद झाला. त्याच्या कर्तृत्वाला नमस्कार! यापुढेही त्यांचे अनुभव वाचायला मिळणार आहेतच. त्यांची वाट बघत राहू.

- वि. म. मराठे, पद्मश्री, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५.
दूरध्वनी : ०२३३- २३०००७२ भ्रमणध्वनी : ९४२०६७८९६५

✸✸✸

आपला अंक आवडला. माझी बायपास एकदम छान. वयस्क माणसांना चांगली माहिती.

- प्रकाश मराठे, सनातन आश्रम, २४/३, रामनाथी, बांदिवडे, फोंडा, गोवा ४०३ ४४१



Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

आपलं संपादकीय फार आवडलं. ऋतू बदलाचे, पावसाच्या आगमनाचे गुंफीत शब्द मनाला भावले. आनंद वाटला. सर्व कार्यकारी तसेच संपादक मंडळास स.न.

- राजा मराठे, (घराणे १४०, पृ. क्र. २५८/२५९)
१४, उद्यम, उद्यमकुंज सोसायटी, राणी सती मार्ग, मालाड (पू.) मुंबई ४०० ०९७, फोन : ०२२-२८७७८६३९

❋❋❋

आपले त्रैमासिक अतिशय चांगले आहे. प्रत्येक पान व पान वाचनीय असते व संग्रही ठेवावे असे असते. हितगुज मार्च २०१२ मध्ये प्रसिद्ध झालेला बाप-घराचे अस्तित्व हा लेख फारच आवडला.

- श्रीमती वर्षा विजय मराठे, मुलुंड, पूर्व. फोन नं. : ०२२-२५६३८९१६

## पुस्तक प्रकाशन सोहळा मनोगत : 'निबंध कुसुममाला' आणि 'काव्य पुष्पांजली'

- सौ. रश्मी फडके (पृ.२६७), रत्नागिरी

*जमिनीवर रोवूनी पाय घेतली झेप। आकाशी लहरे कविता माझी लेक।।*
*अजी मंगलदिन हा आला मम भाग्याने। द्या आशीर्वाद मज तुम्ही बहु मायेने।।*

'नमस्कार, आज आपण माझ्या पुस्तक प्रकाशनासाठी जमलो आहोत. श्री. पटवर्धन सर, सुप्रसिद्ध प्रकाशिका श्रीमती सुलभा धामापूरकर, सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती स्मिता राजवाडे, लेखिका डॉ. सौ. साधना गोगटे आणि उपस्थित मान्यवर यांच्या साक्षीने मी माझे मनोगत सांगते आहे.

माझे आई-बाबा, आजी-आजोबा, पणजी आणि नातेवाईक यांच्या सुसंस्कृत छत्रछायत मी वाढले. माझे गुरूजन व आईवडील यांच्या संस्कारांची शिदोरी घेऊन मी आज इथवर येऊन पोहोचले आहे. त्या संस्कारांचा मला सार्थ अभिमान वाटतो. माझी मराठी शाळा आणि विद्यामंदीर पावसमधील दिवस मी कधीच विसरू शकत नाही. या सर्वांची मी ऋणी आहे.

मी व्यावसायिक लेखिका नाही. त्यामुळे माझ्या साहित्यात खूप त्रुटी असू शकतील. पण म्हणतात ना, 'टू अर इज ह्यूमन' त्यामुळे आपल्या सूचना, दुरुस्ती यांचा स्वीकार मी मन:पूर्वक करीन. आपल्या प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.

हे निबंध वेळोवेळी वर्तमानपत्रात आलेल्या विषयांवर लिहिलेले आहेत. त्यातील काही आकाशवाणीवर सादर केले आहेत. आकाशवाणीचे आमच्या आचार, विचार यांवर खूप परिणाम आहेत. तेव्हा मनोरंजन आणि शिक्षण यांचे एकेमव श्राव्य साधन होते. आकाशवाणीच्या प्रोत्साहनामुळे मी खूप काही लिहू शकले.

माझ्या कविता संग्रहातील प्रत्येक कवितेमागे काही विचार आहेत. मनातील भावना शब्दबद्ध करताना केव्हा कवितेचे रूप घेतात हेच कळत नाही. काळानुरूप कवितेचे विषय बदलले तरी आशय तोच आहे. कारण सर्व कविता अंतरीच्या गाभ्यातून उमललेल्या कलिका आहेत.

आज १मे महाराष्ट्र दिन आहे. एकशे आठ अमर हुतात्म्यांच्या बलीदानाने आपण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवला आहे. आज महाराष्ट्र सर्वांत अग्रणी आहे. त्यामुळे आपण मराठी असल्याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. तसेच आज कामगार दिन ही आहे. महाराष्ट्राच्या विकासात कामगारांचा महत्त्वाचा सहभाग आहे. मीसुद्धा 'अपना बझार' मधे नोकरी करते. या नोकरीने मला खूप काही दिले. मला माझा आत्मसन्मान मिळाला आहे. माझे अस्तित्व मिळाले आहे. खूप चांगली माणसे मिळाली आणि या जगात वागावे कसे हे सुद्धा समजले. त्यामुळे सर्वांची ऋणी आहे. आणि या ऋणात राहण्यातच माझा आनंद आहे. मी कृतार्थ आहे. जय हिंद जय महाराष्ट्र!

- सौ. रश्मी रवींद्र फडके (पृ.२६७) (चि. शैलजा दिनकर चक्रदेव)
रत्नप्लाझा, रत्नागिरी ४१५ ६१२ मोबाईल : ९४२०७३५२२५

## हितगुज राखीव फंड निधी

अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, श्री. वामन नारायण चक्रदेव, सौ. साधना शिदोरे (पूर्वाश्रमीची वामन नारायण चक्रदेव यांची धाकटी कन्या), सौ. वर्षा गोडबोले, श्रीमती सुलभाताई मराठे, सौ. मीना रविंद्र --, रत्नागिरी.

या देणगी दिलेल्या कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा आभार.

विशेष सूचना : 'हितगुज' राखीव फंड निधी- देणगी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी.



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक ६ जुलै २०१२ला मराठे प्रतिष्ठानची बैठक प्रभादेवी येथील मराठे उद्योग भवनात भरली.

बैठकीला अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारिणी-वरील सदस्य उपस्थित होते. सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचन झाले. पत्रव्यवहारावर चर्चा झाली. श्री. ना. ज. जाईलांच्या सूचनेचा स्वीकार करून त्यावर कृती करावी या संपादिकेया विनंतीला मान देऊन अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांनी १०,०००रु. ठेव म्हणून तसेच उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनीही १०,०००रु. ठेव हितगुजसाठी दिली तसेच मागासवर्गीय मुलांसाठी शिक्षणनिधी म्हणून १५,०००रु. देणगी मराठे प्रतिष्ठानला श्री. रमाकांत विद्वांस यांनी दिले. कार्यकारिणीतील सदस्यांनी त्यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले. इतर कुलबांधवांनीही तीन वर्षासाठी १०,०००रु. रक्कम बिनव्याजी ठेव म्हणून 'हितगुज' साठी द्यावेत. छपाई खर्च वाढत चालला आहे. मराठे प्रतिष्ठानच्या हितगुजला आर्थिक बळकटी देणे आवश्यक आहे असे सर्वानुमते ठरले, तेव्हा जास्तीत जास्त कुलबांधवांनी तीन वर्षासाठी १०,०००रु. ठेव बिनव्याजी ठेवावी. तीन वर्षानंतर त्यांना त्यांची ठेव परत केली जाईल. याची हमी मराठे प्रतिष्ठानने दिली आहे.

यंदाचे आयव्यय, ताळेबंद ठाण्याचे चार्टर्ड अकाऊटंट श्री. मंदार भावे यांनी व्यवस्थितपणे करून दिले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार कार्यकारिणीने मानले.

सुलभाताईंनी केलेल्या फराळाचा आस्वाद घेऊन चहापानाने सभेची सांगता झाली.

---

शुक्रवार दिनांक १७ ऑगस्टला दुपारी चार वाजता मराठे प्रतिष्ठानची बैठक प्रभादेवी येथील मराठे उद्योग भवनात भरली.

बैठकीला अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, कार्यवाह मोहन मराठे, सी. गो. खांबेटे, प्रभाकर मराठे, श्रीनिवास मराठे, व्ही. के. मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे इ. उपस्थित होते.

मागील सभेच्या कामकाजाचे वृत्तांत वाचन झाले. श्री. मंदार भावे सी.ए यांनी केलेल्या आय-व्यय, ताळेबंदावर चर्चा झाली त्यात काही बदल सुचवून ते सर्वसमंत करण्यात आले. वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचे ठरले. मोहनरावांनी अहवाल वाचला. प्रतिष्ठानकड परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत ते कार्यवाहांकडे कारवाई करण्यासाठी दिले त्याचप्रमाणे दोन विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी मदत म्हणून विचार करून २०,०००रु. त्यांना देण्याचे ठरले. वार्षिक सभेच्या आधी पंधरा दिवस हितगुजचा अंक प्रकाशित होऊन सभेची जागा व वेळ समजेल. श्री. प्रमोद मराठे यांनी त्यांचे चिरंजीव व इंजिनिअर झाले म्हणून पेढे वाटले. चहा-फराळानंतर सभेची सांगता झाली.

## सहवेदना

कै. मधुकर रामचंद्र मराठे, मु. पो. पाली, ता. सुधागड, जि. रायगड यांचे दिनांक २९-४-२०१२ रोजी सायंकाळी ५ वाजता निधन झाले. (वय ७८). त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे पाली येथेच राहतात.

ते ज्येष्ठ नागरी संघटनेचे तालुका अध्यक्ष होते. तसेच ज्येष्ठ नागरिकांना तसे कार्ड मिळवून देत असत. निवृत्त कर्मचारी संघटनेचेही काम पाहत असत. बरेच वर्ष प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले प्रणित स्वाध्याय कार्याशी निगडित होते. श्री. रत्नाकर सुंदर मराठे यांचे ते चुलत बंधू होते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. मधुकर रामचंद्र मराठे यांना विनम्र श्रद्धांजली.



## सहवेदना

श्री. मोहन दिनकर मराठे, कोल्हापूर यांचे दिनांक २-५-२०१२ ला दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे. श्री. नंदकुमार मराठे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. मोहन दिनकर मराठे यांना विनम्र श्रद्धांजली!

## सहवेदना

श्री. प्रभाकर काशिनाथ मराठे, गोरेगाव (जि. रायगड) दिनांक ६-६-.दु:खद निधन झाले. त्यांचे वय ८८ वर्षे होते. श्री. प्रफुल्ल मराठे हे त्यांचे सुपुत्र होत. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. प्रभाकर काशिनाथ मराठे यांना विनम्र श्रद्धांजली!



Marathe Pratishthan


# शिक्षक ते वकील ॲड. दिवाकर गोविंद विद्वांस

सौ. केतकी किशोर पेंडसे, नालासोपारा

श्री. दि. गो. विद्वांस हे एक उत्तम प्रथितयश वकील म्हणून नाव मिळवलेले व्यक्तिमत्त्व. यांचे १६ जून २०१२ रोजी देहावसान झालं आणि समाजवादी चळवळीच्या कार्यातील वसई तालुक्यातील एक दुवा निखळला. कुठे डामडौल नाही की स्वत:बद्दलची आढ्यता नाही. 'ते साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' या उक्तीचा मूर्तिमंत पुतळा होते. असं म्हणतात की माणसांची ओळख अनेक प्रकारांनी होत असते. दि. गो. विद्वांस यांना वसई-ठाणे परिसरातील समाजात कोणी सर म्हणून, कोणी वकील म्हणून, कोणी समाजवादी कार्यकर्ता म्हणून ओळखत होते.

दि. गो. विद्वांस यांचा जन्म २३ जून १९२७ रोजी वावोशी ह्या पूर्वीच्या पेण आताच्या ता. खालापूर, जिल्हा (पूर्वीचा कुलाबा) आताचा रायगड येथे झाला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे वडिलांची आर्थिक परिस्थिती ढासळली व त्यामुळे वयाच्या पंधराव्या वर्षापासून त्यांच्यावर आईवडिलांची जबाबदारी पडली. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यात झाले. परंतु पुढील शिक्षणाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना. म्हणूनच पुढे कधी टेलिफोन ऑपरेटर, कारकून, माध्यमिक शिक्षक, काही काळ एके ठिकाणी रात्र पाळी व लगेच दुसरीकडे दिवसपाळीची नोकरी असे दिवसातील १६ ते १८ तास ते सतत काम करत व ते करत करत त्यांनी आपले एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पीएचडी. साठी प्रबंध तयार केला व त्यांना इंग्लंडला जायची संधी मिळत होती. परंतु आईवडिलांची जबाबदारी कोण स्वीकारणार? हा मोठा यक्षप्रश्न निर्माण झाला व त्यांनी मोठ्या निग्रहाने इंग्लंडला न जाण्याचे निश्चित केले व उच्च महाविद्यालयात शिक्षकाची नोकरी पत्करली.

या सर्वांबरोबरच त्यांनी स्वत:ला अनेक सामाजिक कार्यामध्ये झोकून दिले. ९ जून १९४९ रोजी ते आगाशी, ता. वसई येथे शिक्षक म्हणून रूजू झाले. १९५१ ते १९५४ या काळात ते खामगाव येथील गोविंदराव सक्सेरिया कॉलेजात गेले व पुन्हा आगाशी येथे परत आले. पुढे



सुमारे ५० वर्षे त्यांचे आगाशीला वास्तव्य होते. त्यामुळे त्यावेळी त्यांना 'सर' ही प्राप्त झालेली उपाधी व नंतर वकीलसाहेब ही बिरूदावली या दोन्हींचा त्यांना सारखाच अभिमान होता. १९५४च्या सुमारास ते समाजवादी पक्षाचे काम करू लागले. १९५५-५६मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यात सहभाग, गोवा विमोचन समितीचेही काम केले. आदिवासी भागात पक्ष संघटना बांधण्याचे काम केले. ठाणे जिल्हा परिषदेचे सदस्य, जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते, ठाणे जिल्हा जनता दलाचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र सोशलिस्ट पार्टीचे उपाध्यक्ष व कार्यकारिणीचे सदस्य, हिंदू मजदूर किसान पंचायतीचे उपाध्यक्ष, न्यू इंडिया को.ऑ.बँकेचे सल्लागार, आगाशी येथील सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक सदस्य, अध्यक्ष व नंतर विश्वस्त या नात्याने वाचनालय वाढवण्यात व नावारूपाला आणण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता, ग्रामीण शिक्षण संस्था सफाळे या संस्थेची घटना तयार करून दिली व १९९१ ते १९९४ या काळात संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. अशा अनेक पदांवर त्यांनी निस्पृहपणाने, निष्ठेने व जीव ओतून काम केले. समाजवादी चळवळ व संयुक्त महाराष्ट्राची चळवळ या निमित्ताने देशभर संचार तसेच समाजवादी चळवळीचे अध्वर्यू डॉ. राम मनोहर लोहिया, तसेच जॉर्ज फर्नांडिस, सदाशिवराव बागाईतकर, जयप्रकाश नारायण, मधू दंडवते, मृणालताई गोरे इत्यादी नेत्यांशी त्यांचे निकटचे संबंध होते. विस्तृत वाचन व प्रगल्भ विचार यामुळे त्यांची मते ठाम असत व कोणाचीही भीड न बाळगता ते ती व्यक्त करत. ते भक्तीमार्गी नव्हते आपले काम मनापासून करणे ही सर्वोत्कृष्ट पूजा आहे हे त्यांचे निश्चित मत होते. लोकमान्य टिळक हे त्यांचे प्रेरणास्थान होते. ते त्यांचे निस्सीम भक्त होते.

वयाची उमेदीची पंचवीस वर्षे शिक्षकी पेशा व विविध प्रकारचे सामाजिक कार्य करत असतानाच परिस्थिती त्यांना एका विचित्र निराशाजनक वळणावर घेऊन पोहोचली. संयुक्त महाराष्ट्र समितीचे काम करीत असल्यामुळे त्यांच्यावर कम्युनिस्ट म्हणून शिक्का मारला गेला व त्यांना नोकरी सोडणे भाग पडले. अशावेळी न डगमगता ते पुन्हा वकिली शिक्षणाकडे वळले. वयाच्या ४२व्या वर्षी त्यांनी कायद्याचा अभ्यासक्रम सुरू केला. ४५व्या वर्षी वकिलीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. वकिलीची सनद मिळाल्यावर त्यांनी मुंबई हायकोर्टात वकिली सुरू केली व एक उत्तम प्रथितयश वकील म्हणून नावलौकिक मिळवला. पुढे आयुष्यातील ३५ वर्षे ते वकील या नात्याने कार्यरत राहिले. वसई तालुक्यातील मुसलमान व ख्रिश्चन समाजालाही त्यांच्याबद्दल अतिशय आदर होता.

ब्राह्मण नाही हिंदू ही नाही
न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडिती
प्रदेश साकल्याचा

केशवसुतानी त्यांच्या कवितेत नव्या मनूच्या नवविचारांचा कार्यकर्ता कसा असावा याचे वर्णन केले आहे. ते श्री. विद्वांस यांना तंतोतंत लागू पडते. सर्व जातीधर्माच्या लोकांच्या आदराला पात्र होण्याची क्षमता त्यांच्यात होती. हेच त्यांचे श्रेष्ठत्व.

असं म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुष्याच्यामागे एक स्त्री उभी असते विद्वांसांच्या पाठीशी त्यांची आई व त्यांच्या पत्नी सौ. विजया



Marathe Pratishthan

विद्वांस या दोन स्त्रिया खंबीरपणे उभ्या होत्या. अत्यंत अबोलपणे आपल्या पतीला त्याच्या कार्यात साथ देण्यासाठी विजयाबाईंनी शिक्षिकेची नोकरी केली व संसाराचा आर्थिक भार अनेक वर्षे आपल्या शिरावर घेतला व नेटाने पार पाडला. त्याचवेळी त्यांच्या आईने त्यांच्या तिन्ही मुलांचा सांभाळ केला. त्यांच्यावर उत्तम संस्कार केले. त्यांना अभ्यासाची गोडी लावली. ते या दोघींचे ऋण नेहमीच मान्य करत.

हे मी लिहिले ते माननीय दि. गो. विद्वांस यांच्याबद्दल. पण ते आमचे 'बाबा' होते. आम्हाला घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. वागण्यात निर्भीडपणा असावा, स्वत: निर्णयक्षम असावे. यावर त्यांचा भर होता. स्वत:च्या मुलांची शिक्षणे, नोकरी यासाठी कोठेही स्वत:ची 'पत' त्यांनी वापरली नाही. अशा वागण्यामुळे निस्पृहतेचे संस्कार आमच्यावर आपोआपच झाले. मधल्या काळात अतिशय प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असूनसुद्धा त्यांनी आम्हाला जास्तीत जास्त शिक्षण घेण्यासाठी उद्युक्त केलं. आम्ही आमच्या कुवतीनुसार ते घेण्याचा प्रयत्न केला. ते नेहमी सांगत,'तुम्हाला जेवढं शिकायचं तेवढं शिका.' कमावलेला पैसा उद्या आपल्याकडे राहिलच याची शाश्वती नाही, परंतु घेतलेले शिक्षण व ज्ञान कधीच वाया जाणार नाही व कोणी हिरावून घेणार नाही. परिस्थिती कितीही प्रतिकूल बनली तरी केवळ ते ज्ञानच तुम्हाला तारून नेईल. आपल्या मुलांनी रोज सकाळी व्यायाम करावा, शाळेत वेगवेगळ्या खेळात सहभाग घ्यावा, त्यांना पोहता यावं, त्यांनी अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन करावं असं त्यांना मनापासून वाटत असे व सतत आम्हाला प्रोत्साहन देत असत व हे सर्व ते कटाक्षाने आमच्याकडून करून घेत असत. त्यांची वेळेची शिस्त अतिशय कडक होती. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व कौटुंबिक जीवनात विशिष्ट ध्येयप्रणाली बाळगून तत्त्वाशी तडजोड न करणारी आमच्या बाबांसारखी माणसे पाहावयास मिळणे ही दुर्मिळ गोष्ट आहे. व अशा आईवडिलांच्या पोटी जन्माला येण्याचे भाग्य आम्हाला मिळाले.

जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांची ज्ञानलालसा जिवंत होती. ते सतत वाचन, लेखन करीत असत. जीवनाच्या उत्तरआयुष्यात सुविद्य पत्नी दोन कर्तबगार व उच्चशिक्षित पुत्र, उच्चशिक्षित सुना, मुलगी सुविद्य व सुशील जावई या सर्वांचे नांदते संसार, नातवंडे यांच्या सान्निध्यात सुखासमाधानाच्या परमोच्च शिखरावर असताना अतिशय शांतपणे त्यांचे प्राण पंचत्वात विलीन झाले. अशा या विद्यासंपन्न, नीतिसंपन्न, कर्तृत्ववान विभूतीला माझे लाख लाख प्रणाम.

**- सौ. केतकी किशोर पेंडसे,** नालासोपारा
(पूर्वाश्रमीच्या मीरा दिवाकर विद्वांस)

## मानसन्मान

कु. सायली जयंत मराठे (पृ.४०२) हिला २०११-२०१२ च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ७५.४५% गुण मिळाले. तसेच हिंदी या विषयात १००पैकी ८८ गुण मिळवून काकासाहेब चमणकर हायस्कूल, आडेली, वेंगुर्ला या शाळेत ती प्रथम आली आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. सायलीचे हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा!

## मानसन्मान

' माझा परिवार' नावाची मराठे परिवार व्यक्तिचित्रण स्पर्धा २०१२ मध्ये श्री. गजानन चिंतामण मराठे यांनी आयोजित केली होती. त्या स्पर्धेत सौ. वर्षा गोडबोले (पृ.१२९) यांना बक्षीस मिळाले. त्याबद्दल मराठे प्रतिष्ठानतर्फे त्यांचे अभिनंदन! पुढील अंकात बक्षीसपात्र निबंध छापला जाईल.

## मानसन्मान

कु. मृणाल आनंद मराठे, सांगली (पृ.५४) हिला २०१२च्या दहावीच्या परीक्षेत ९०.१७% गुण मिळाले. मराठे प्रतिष्ठाद्वारा कु. मृणालचे हार्दिक अभिनंदन! तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तिला हार्दिक शुभेच्छा!

## मानसन्मान

श्री. सतीश मराठे (पृ.१२९) यांच्या पत्नी सौ. भारती मराठे या न्यू इंडिया ॲश्युरन्स मध्ये कामास असून त्यांना प्रशासकीय अधिकारी म्हणून त्याचे डिसेंबर ११ मध्ये प्रमोशन झाले असून त्यांची अंधेरीच्या कार्यालयात बदली झाली आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## अभिष्ट चिंतन

सौ. आसावरी गजानन मराठे (पृ.१२९) यांनी १-८-२०१२ ला ६१व्या वर्षात पदार्पण केले. मराठे प्रतिष्ठानद्वारे त्यांचे अभिष्टचिंतन. उत्तम आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य त्यांना लाभो ही सदिच्छा!

Marathe Pratishthan

## काही सांस्कृतिक धारणा

१. फलेन फलितं कार्यम्। : आपण अनेक पूजा करतो. त्या वेळी पुरोहित मंत्र म्हणत असतात त्या मंत्रांकडे आपले लाक्ष मुळीच नसते. भटजींना मंत्र म्हणता येतात, त्याचा अर्थ कळतोच असे नाही. ते मधून मधून सूचना देत असतात. त्यातली एक अशी - फळ ठेवा. आपण देवापुढे फळ ठेवतो. भटजी म्हणतात, ''फलेन फलितं कार्यम्' म्हणजे फळाने कार्य सफल होवो.. ('सफल' या शब्दात सुद्धा 'फळ' आलेच) Similar breeds similar ही धारणा विविध रूपात किती ठिकाणी दिसते बघा. एकेकाळी चातुर्मासात अनेक सणांच्या आणि व्रतांच्या कहाण्या वाचल्या जात. या कहाण्यांचा शेवट 'ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण. सवाष्णीची ओटी नारळ या फळाने भरीत. ओटी म्हणजे गर्भाशय. त्या तुझ्या 'ओटीत' पुत्रगर्भ राहो. ही त्या विधीमागची शुभेच्छा. वयात आलेली स्त्री 'पुष्पवती' होते. म्हणजेच 'फल'धारणेपूर्वीची 'पुष्प' ही अवस्था प्राप्त करून घेते. या धारणेला नाव आहे 'सदृशात् सदृशोत्पत्तिः।'

२. निरांजन ओवाळणे आणि संरक्षक कवच : निरांजन हा मराठी शब्द आहे. तो मूळ संस्कृत शब्द आहे 'नीराजनम्' त्याचा अर्थ ओवाळणे. मराठीत आपण निरांजन ओवाळण' अशी 'डबल बॅरल' ओवाळणी करतो. या कृतीचा हेतू काय? तो आहे व्यक्तिभोवती अग्नीचे कवच निर्माण करणे. अनेक प्राण्यांच्या शरीरावर संरक्षक कवच असते. उदा. कासव, गोगलगाय, गेंडा इ. यावरून माणसाने युद्धात शस्त्रांपासून रक्षण करण्यासाठी धातूंची कृत्रिम कवचे बनवली.

अग्नीचे कवच ही कल्पना वैदिक ब्राह्मण ग्रंथांत आढळते. त्यानुसार हवनीय द्रव्याचे 'पर्यग्नीकरण' परि म्हणजे सभोवती + अग्नी -करण म्हणजे अग्नीने संरक्षणात्मक कृती करायची. या कृतीची पुढची पायरी म्हणजे दिव्याच्या साह्याने ओवाळणे. ते शरीराभोवती करण्यापेक्षा केवळ मुखाभोवती केले जाते. कारण मुख हा आपला 'खरा चेहरा' दाखवणारा अवयव आहे. त्यावरूनच मुख्य, प्रमुख असे शब्द आणि वाक्प्रचार झालेले दिसतात.

विवाहित स्त्रियांनी घालण्याचा एक अलंकार आहे 'वेढणे'. त्याने वधूभोवती दैवीशक्तीचा 'वेढा' घातला जातो. स्त्रियांचा आणखी एक सौभाग्य अलंकार आहे कांकणें किंवा बांगड्या. त्यांचाही उद्देश 'रक्षण' हाच आहे. आज हे रक्षण पतीचे मानले जाते, पूर्वी ते पत्नीचे संरक्षणाचे साधन असावे असे दिसते.

**- अ. द. मराठे (पृ. २७०)** ६ मंजूषा, विकास हाऊसिंग सोसायटी, शास्त्रीनगर, डोंबिवली (प.) ४२१ २०२,
फोन : ०२५१-२४९९८४२ मोबाईल : ९८५०२४१९१३

## कविता

*आल्या श्रावणाच्या सरी । सूर्य नारायण तो कोपतो ।*
*राजाच्या राणीला त्या । दुःख कष्ट भोगाला लावतो ॥१॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । शंभू कैलासी नाचतो ।*
*शंख डमरूच्या संगे । शूल तांडव खेळतो ॥२॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । घरोघरी मंगळागौरी ।*
*झिम्मा फुगडी नादाने । दुमदुमते ती नगरी ॥३॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । नागराच तो डोलतो ।*
*फांद्यावरी हिंदोळ्यावर । पंचमीचा सण होतो ॥४॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । मामा भाचे येती घरा ।*
*दारावरी येऊनिया । अल्लख निरंजनाच पुकारा ॥५॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । जिवती देवी देई आशीर्वाद ।*
*मुलाबाळांसह सांगे । काय हवे ते मज सांग ॥६॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । शनी मारुतीचा तो फेरा ।*
*दारी येऊनिया मागे । तेल घाल डोईच्या त्या घेरा ॥७॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । नारळी पूनम सजते ।*
*रक्षा बंधनाचे नारी । भावाला त्या ओवाळिते ॥८॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । कृष्ण गोकुळात येतो ।*
*नंद यशोदा माईला । प्रेमभरी सुखवितो ॥९॥*
*आल्या श्रावणाच्या सरी । देती आनंद सर्वांना ।*
*उत्सुक होती सारे । गजगौरी आगमना ॥१०॥*

**- श्रीमती सुहासिनी नारायण मराठे, (पृ.१८)** मराठे वाडा, सिद्धेश्वर आळी, कल्याण

## नांदा सौख्यभरे

मराठ्यांची माहेरवाशीण सौ. जया मराठे आत्ताची सौ. अपर्णा सदाशिव कुलकर्णी यांची कन्या चि. सौ. चैत्रा हिचा विवाह पुण्यात दिनांक २४-६-२०१२ रोजी झाला. सौ. चैत्राचे पती श्री. अनिरुद्ध हीदगोळ हे मूळचे सोलापूरचे असून सध्या मुंबईत नोकरीस आहेत. वरील प्रसंगी सर्व मराठे परिवार व कुलकर्णी परिवार उपस्थित होता. वधुवरांना मराठे परिवाराकडून शुभेच्छा! मराठे प्रतिष्ठानद्वारा वधूवरांना शुभाशिर्वाद!



Marathe Pratishthan

रसास्वाद

# नैवेद्य : कवयित्री : श्रीमती प्रतिभा सुधाकर मराठे

## ईश्वराच्या भक्तीने काठोकाठ भरलेली कविता.

कवितेच्या आजवर अनेक व्याख्या झाल्या. त्यात 'काव्यं, यशसे, अर्थकृते, व्यवहारविदेत, शिवेतरक्षतसे, कांतासमीतयोपदेशयुजे' किंवा 'वाक्यं रसात्मकं काव्यं' रसपुरित वाक्यातून व्यक्त होणारा अर्थ हा काव्यातून निघालेला असतो आणि काव्य निर्माण होतं ते रसभरित अंत:करणातूनच समुद्र जसा चंद्रदर्शनानं उंचबळतो तसा हा भक्तिरस प्रतिभाताईंच्या 'नैवेद्य' काव्यसंग्रहातून वाहू लागतो. शृंगार,वीर, करुण, अद्‌भुत इ. नवरसांप्रमाणेच भक्ती हा दहावा रस आहे. प्रतिभाताईंच्या कविता या भक्तीरसात भिजलेल्या कविता आहेत. आणि या भक्तीरसपूर्ण कवितांचे बीज प्रतिभाताईंच्या बालपणीच्या संस्कारात आहे. त्याचे वडील रोज गुरुचरित्र व आई दासबोध वाचत असे. स्नानानंतर तुळशीला प्रदक्षिणा घालत असे. तेव्हा लहानपणापासूनच देवाबद्दलचे प्रेम आणि वाचनाची आवड यांचा वारसा कवयित्रीला लाभला, यापरते दुसरे भाग्य ते कोणते?

या काव्यसंग्रहात एकूण ११६ कविता आहेत. त्यातल्या काही गणपतीबाप्पावर, काही संतांवर, श्रीराम, श्रीकृष्ण, विठ्ठलावर, देवीमातेवर, आरत्या, पोवाडा, स्तोत्रे अशा विविध प्रकारात आहेत. 'गणपत्ती बाप्पा' कवितेत कवयित्री बाप्पाचे दागिने अंगावर घालायला मागते ती म्हणते, 'अंगावर दागिने तुझ्या किती । मुकुटाला तुझ्या लाख मोती।। दागिने तुमचे सारे मोजू का? मोजायला चुकले तर रागावू नका।। पार्वती मातेला एकदा सांगशील का? मला एकदा घालायला देशील का? (पृ.९) तसेच 'नवस फेडाया घंटा बांधिती म्हणोनी नाम असे घंटाळी' (पृ.१०) असे माते घंटाळी कवितेत म्हणते. घंटाळी देवीने प्रसन्न होऊन कवयित्री कडून ही आरती लिहून घेतली, त्यापूर्वी घंटाळीची स्वतंत्र अशी आरती नव्हती. आजही ठाण्याच्या घंटाळी मंदिरात फलकावर ही आरती लिहिली आहे. 'आरती वटवृक्षाची' कवितेत वटवृक्ष पर्यावरणाची रक्षा करतो. 'आरती दासबोधा'ची या कवितेत कवयित्री म्हणते दासबोध हा बोधामृत आहे आणि मनने मन हो तृप्त। (पृ.१२). 'परशुराम'कवितेत भगवान परशुरामांचे संपूर्ण जीवन कार्य साकार केले आहे. (पृ.७४ कविता ७८वी). 'वाटलं होतं...' (पृ.७५) कवितेत ती देवाची वाट पाहत आहे, ती आतुरता, देवाने स्वप्नात, 'उद्या नक्की' येणार सांगितल्यामुळे कवयित्री सुसज्ज तयारी कशी ठेवते याचे चित्र रेखाटले आहे. देव आले नाहीत म्हणून सकृतदर्शनी ती निराश होते, पण तोच मनाचे समाधान करून घेताना म्हणते, केवढा तुमचा व्याप तुमची कमाल। वाट पाहीन तुमची नित्य। वाट पाहणे हे माझे व्रत। खात्री आहे कधी तरी तुम्हा याल।। दुसऱ्या एक कवितेत, 'पंढरपूरची रुक्मिणी आली। नवऱ्याची तक्रार करू लागली। नुसताच उभा। हात कटेला।। असे म्हणताना दिसते. ८४वी कविता दीप ही आशावादी कविता, उज्ज्वल भविष्य सांगते, वंशाचा दीप प्रकाश। उद्याचे गे माऊली।। तसेच 'एकवार अंगावरून फिरो तुझा हात। शेवटले घरकुल माझे तुझ्या अंगणाला।।' किंवा 'विनायका वदली। कागद झाले आहे।। इतर प्रथितयश, मान्यवर कवींच्या कवितेसारख्या ओळी येतात तेव्हा मूळ कवीची कविता आठवते. (उदा. पृ. ७२-७३)

**उत्कट भक्तीगीते**

या कवितासंग्रहातील पाळणा, भूपाळी, जागरगीत, आरत्या ही सारी भक्तीगीते आहेत आणि ती भावप्रधान आहेत. या कवितांना भावानुरूप चाल आणि सूर लावले तर या कविता कर्णमधुर अशी उत्कट भक्तीगीते साकारतील. 'यात्रा' कवितेत कोल्हापूर, गाणगापूर, पंढरपूर, अष्टविनायक, जेजुरी समर्थांचे अकरा मारुती, अयोध्या, गोकुळ, द्वारका सर्व तीर्थदेवतांना भेटता येते. ही कविता कोरसमध्ये सर्वांनी सामूहिक म्हणावी अशी आहे.

'नैवेद्य' कवितासंग्रहातील कवितेत एक उस्फूर्तता आहे. काही कल्पना खास कवयित्रीच्याच आहेत. त्या वेगळ्या म्हणून जाणवल्या आणि आवडल्या. भक्ती आणि ज्ञान यांच्या समन्वयातून हा कवितासंग्रह सिद्ध झाला आहे.

परमेश्वराला सर्वश्रेष्ठ मानून त्याच्या सगुणरूपाचे ध्यान करावे, त्याच्या अवतारकृत्यांचे स्तवन करावे व स्वत:चे अपराधित्व मांडून स्वोद्धारार्थ त्याची आळवणी करावी, उत्कट भक्ती करावी, नामस्मरणात रमावे, हे 'नैवेद्य' कविता संग्रहातील कवितांचे स्वरूप आहे. सात्त्विक काव्यनिमिर्ती आहे. कवयित्री कवितेच्या माध्यमातून परमेश्वराचे, साधुसंतांचे गुणगान करीत आहे. काव्यसंग्रहाचे शीर्षकही समर्पक. भक्तीचा हा महानैवेद्य देवच नाही तर भाविक भक्त ही प्रसन्न होणार. समस्त मराठे परिवार हा नैवेद्य प्रसाद ग्रहण करून तृप्तीची ढेकर देणार हे निश्चित. हा कवितासंग्रह प्रतिभाताईंनी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांना साष्टांग दंडवत घालून अर्पण केला आहे.

सुधीर मुणगेकर, मनिषा गोळे यांनी मुखपृष्ठ सुंदर रेखाटले आहे. पुस्तकाची मांडणी, छपाई व निर्मिती उत्कृष्ट आहे. 'व्यास क्रिएशन' या संस्थेच्या उज्ज्वल परंपरेस साजेल असा हा कविता संग्रह आहे.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)**

**नैवेद्य : कवयित्री : श्रीमती प्रतिभा सुधाकर मराठे**
प्रथमावृत्ती : १६ फेब्रुवारी, २०११ * मूल्य : १००रु.
पत्ता : ४०३, मनसुबा सहनिवास, रामगणेश गडकरी मार्ग, घंटाळी, नौपाडा, ठाणे ४०० ६०२
फोन : ०२२- २५४२०७७१

Marathe Pratishthan

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्
बिल्डर ॲंड डेव्हलपर्स

आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

imepl08/09

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिन्मय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan